नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक ९६ * | * अमरावती * | गुरुवार, दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## शहा जीमेल वरून झोहो मेलवर शिफ्ट



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ८ :**
केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जीमेल वरून स्वदेशी प्लॅटफॉर्म झोहो मेलवर स्विच केले आहे. शहा यांनी बुधवारी एक्स वर पोस्ट केले की त्यांनी झोहो मेलवर एक आयडी तयार केला आहे. आता प्रत्येकाने नवीन ईमेल पत्त्यावर ईमेल पाठवावेत.

मी झोहो मेलवर स्विच केले आहे. कृपया माझ्या ईमेल पत्त्यातील बदल लक्षात घ्या. माझा नवीन ईमेल पत्ता amitshah.bjp@zohomail.in) आहे. ईमेल पत्रव्यवहारासाठी हा ईमेल पत्ता वापरा, असे त्यांनी समाजमाध्यमांवर लिहिले आहे.

अग्राग्रलेख

# खरीखरी..

## आता मुंबापुरी : तीन व चार

गेल्या पंचवीस ते तीस वर्षांमध्ये महाराष्ट्राने आणि देशाने मुंबईच्या शेजारीच दुसरी मुंबई पाहिली. १९६५ सालाच्या नंतर दाटीवाटीत स्थापित असलेल्या मुंबईने समुद्राला मागे सारून नरीमन पॉईंट भागात सुसज्ज आणि भव्य इमारतींचे अनेक मजले पाहिले त्यासोबतच तशाच इमारतींचे जाळे पसरवले गेले. त्यानंतर १९९० च्या दशकामध्ये दत्ता सावंत यांनी गिरणी कामगारांचा संप केला आणि गिरण्या आणि गिरणगाव पार लयाला गेले. त्या भागातील गिरण्यांच्या जागेवर सुद्धा मुंबईला नवी करण्यासाठी भव्यदिव्य योजना मोठमोठे रस्ते आणि रहिवाशांनाही उपयुक्त अशी घरे बांधण्यात आली. एवढे केल्यावरही अफाट पसारा असलेल्या मुंबईला कवेत घेणे शक्य नव्हते. त्यानंतर किंवा तेवढ्यातच मानखुर्द येथे समाप्त झालेल्या मुंबईला पूरक म्हणून समुद्राच्या खाडीवर चार चाकी वाहनांसाठी मोठा पूल उभारण्यात आला आणि त्यानंतर हळूहळू नवी मुंबई स्थापन झाली. ती आता पनवेलपर्यंत पोहोचलेली आहे. ही नवी मुंबई आखीव, रेखीव आणि लोकल रेल्वेसाठी भव्यदिव्य स्थानकांनी युक्त आणि स्वच्छ अशी होती. त्यासोबत ऐसपैस रस्त्यांनी त्या मुंबईची शोभा वाढवली होती. आता हे ऐसपैस रस्तेही नव्या मुंबईच्या नव्या गदीर्ला अपुरे वाटू लागलेले आहेत. अजस्त्र अजगरासारखी विस्तारलेली ही नवी मुंबई आता मुंबईचा भागच झाली आहे. पण मुंबईच्या विशालतेला ही नवी मुंबई आता कमी पडू लागली आहे. त्यामुळेच आपल्या द्रष्ट्या मुख्यमंत्र्यांनी म्हणजेच फडणवीस साहेबांनी नवी मुंबईच्या पुढे मुंबई क्रमांक तीन आणि चार याची परिकल्पना आणि योजना करून त्याची आखणी करण्याची घोषणा केलेली आहे. सध्याची पसरलेली मुंबई आजच कोलकाता या शहरापेक्षा मोठी झालेली आहे. मुंबईचे अनेक उद्योगधंदे सद्या गुजरातला गेलेले आहेत. तरीही सामान्य लोकांच्या आशा पूर्ण करणारी ही किमयानगरी कोणी कितीही प्रयत्न केला तरी आजही भारताची आर्थिक राजधानी आहे, पुढे राहील. हे दिल्लीला जरा नीट समजून घ्यावे लागेल. राजधानी म्हणून जरी दिल्लीच्या हस्तिनापूराला महत्त्व आहे किंवा जे पांडवांचे इंद्रप्रस्थ आहे ते आहेच. परंतु भारताचे प्रवेशद्वार म्हणून मुंबई किंवा मुंबई बंदराचे असलेले महत्त्व दिवसेंदिवस अधिकाधिक घट्ट होत आहे आणि म्हणूनच आता आपल्या मुख्यमंत्र्यांनी तीन आणि चार क्रमांकाच्या मुंबईची कल्पना केलेली आहे. ही केवळ कवी कल्पना नाही तर, भविष्यातील महामुंबईच्या महानतेचा राजमार्ग आहे. गेल्या पाच, पंचवीस वर्षांमध्ये महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचे लोंढे शहरांकडे वळू लागलेले आहेत. त्यांच्यासाठी किंवा भारतातील इतर अनेक राज्यांसाठी स्वप्ननगरी मुंबई नव्या नव्या शहरांच्या माध्यमाने साकार होणार आहे. आम्ही भव्यदिव्य कल्पना करणाऱ्या आणि ती साकारणा?या किंवा साकारण्याचा निर्धार करणाऱ्या आपल्या कणखर मुख्यमंत्र्यांना यश मिळो, अशी मनापासून आशा व्यक्त करीत आहोत. आमच्या या आशाअपेक्षा सोबत महाराष्ट्रातील जनता निश्चितच मुख्यमंत्र्यांच्या मागे आणि आमच्या सदिच्छांमागे उभी राहील, यामध्ये कुठलीच शंका नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# दहशतवादी हल्ल्यानंतर कोणाचा दबाव?

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदीचा काँग्रेसवर अप्रत्यक्ष निशाणा : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन







■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन केले. एक टर्मिनल आणि एक धावपट्टी असलेल्या पहिल्या टप्प्याची क्षमता दरवर्षी दोन कोटी प्रवाशांना हाताळण्याची आहे. त्यांनी मुंबई मेट्रो लाईन ३ च्या फेज २ बी चे उद्घाटन देखील केले.

ही मुंबईची पहिली पूर्णपणे भूमिगत मेट्रो लाईन आहे. नवी मुंबई विमानतळावरील टर्मिनल कमळाच्या आकाराच्या डिझाइनमध्ये विकसित करण्यात आले आहे. डिसेंबरमध्ये येथून नियमित उड्डाणे सुरू होतील. हे मुंबईचे दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. शेतकरी नेते डी.बी. पाटील यांचे नाव या विमानतळाला देण्यात आले आहे.

या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस पक्ष आणि महाविकास आघाडी सरकारवर निशाणा साधला. काँग्रेसच्या कमजोरीमुळे आतंकवाद्यांना मजबूत केले. मात्र, आता काँग्रेसला हे सांगावे लागेल की, ते कोण होते? ज्यांनी विदेशी दबावांमध्ये निर्णय घेतला. ज्यांनी मुंबई आणि देशाच्या भावनेसोबत खेळ खेळला. देशाला हे जाणून घेण्याचा हक्क देखील आहे.

काँग्रेसच्या या कमजोरीमुळे आतंकवाद्यांना मजबूत केले. देशाच्या सुरक्षेला कमजोर केले. याची किंमत देशाला वारंवार चुकवावी लागल्याचे पीएम मोदी यावेळी म्हणाले . आमच्यासाठी देश आणि देशाची सुरक्षा या व्यतिरिक्त काहीच मोठे नाही. आजचा भारत दमदार प्रत्युत्तर देतो, घरात घुसून मारतो. हे जगाने ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाहिले आहे. याचा गर्व असल्याचे मोदी म्हणाले.

गेल्या अकरा वर्षापासून देशवासीयांचे जीवन सुविधाजनक करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. त्यामुळेच



मुंबईत एका टोकापासून दुसऱ्या टोकाला जायला केवळ एकच तास लागायला हवा. हे काम केवळ आणि केवळ महायुतीच करू शकते. गेल्या तीन वर्षात राज्याचा विकास डबल वेगाने होत आहे, मोदी यांच्या आशीवार्दाने देशातील सर्वोत्कृष्ट इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्प हे महाराष्ट्रात उभे राहत आहेत, असा दावा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला.

ँग्रेस सरकारच्या काळामध्ये महाराष्ट्राला दिलेल्या निधीच्या तुलनेत पाच पट जास्त मदत नरेंद्र मोदी सरकारने महाराष्ट्राला दिली, ही मदत कायमस्वरूपी राहील, असा विश्वास देखील शिंदे यांनी व्यक्त केला.



मुंबई आणि महाराष्ट्राच्या विकासाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नेहमीच साथ मिळाली आहे. आजचा दिवस मुंबई आणि महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून सुवर्ण अक्षरांना लिहिण्यासारखा असल्याचे अजित पवार म्हणाले. यामुळे रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार असून, या विमानतळामुळे मुंबईसह महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला नवी दिशा मिळेल असे ते म्हणाले. महाराष्ट्र सरकारच्या पाठीशी नरेंद्र मोदी यांचे सरकार ठामपणे उभे असल्यामुळेच या विमानतळाचे काम जलद गतीने पूर्ण झाले असल्याचा दावा अजित पवार यांनी केला.

### देशातील सर्वात मोठी अंडरग्राउंड मेट्रो मुंबईत - सीएम फडणवीस

वेगवेगळे अडथळे पार पाडत नरेंद्र मोदी यांच्या आशीर्वादाने अंडरग्राऊंड मेट्रो पूर्ण झाली आहे. देशातील सर्वात मोठी अंडरग्राउंड मेट्रो आपण मुंबईत तयार करू शकलो, याचा मला अभिमान आहे, असे फडणवीस म्हणाले. अनेक अडथळ्याची शर्यत पार करत आम्ही या मेट्रोचे काम पूर्ण करू शकलो. याचे कारण या प्रत्येक क्षणाला पंतप्रधान नरेंद्र मोदी आमच्या पाठीशी होते. केंद्र सरकार पाठीशी उभे असल्यामुळेच हे सर्व अडथळे पार झाल्याचे ते म्हणाले. दहा वर्षात जी कामे झाली नव्हती, ती सर्व कामे नरेंद्र मोदी यांच्या एका बैठकीमध्ये पूर्ण केली असल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. हे केवळ एक विमानतळ नाही तर महाराष्ट्र आणि भारताच्या विकासामध्ये महत्त्वाची भूमिका निभवणार आहे. हा एकच एअरपोर्ट महाराष्ट्राचा जीडीपी एक टक्क्यांनी वाढवण्याची क्षमता ठेवतो. यातून महाराष्ट्र मोठ्या प्रमाणात पुढे जाणार आहे. या देशातील पहिले एअरपोर्ट आहे, ज्याला वॉटर टॅक्सीची कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. त्यामुळे त्याला ट्रॅफिक असणार नाही. थेट गेट वे ऑफ इंडिया पर्यंत जाता येईल, अशा पद्धतीची व्यवस्था करण्यात आली असल्याचा दावा फडणवीस यांनी केला.

जपान, अमेरिका, ऑस्ट्रेलियातील शास्त्रज्ञांना

## रसायनशास्त्रातील नोबेल

■ **वृत्तसंस्था, स्टॉकहोम, दि. ८ :**
या वर्षीचा रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार सुसुमु कितागावा (जपान), रिचर्ड रॉबसन (ऑस्ट्रेलिया) आणि ओमर एम. याघी (यूएसए) यांना जाहीर झाला आहे. रॉयल स्वीडिश अकादमी ऑफ सायन्सेसने बुधवारी याची घोषणा केली.

त्यांनी मोठ्या पोकळ्या असलेले अणू तयार केले आहेत, ज्यामुळे वायू आणि इतर रसायने सहजपणे त्यातून जाऊ शकतात. या रचनांना धातूचे सेंद्रिय फ्रेमवर्क म्हणतात. ते मोठ्या पोकळ्या असलेले स्फटिक तयार करतात. ते विशिष्ट पदार्थांना पकडण्यासाठी किंवा साठवण्यासाठी विशेषतः डिझाइन केले जाऊ शकतात.

त्यांचा वापर वाळवंटातील हवेतील पाणी गोळा करण्यासाठी, कार्बन डायऑक्साइड स्वच्छ करण्यासाठी, विषारी वायू साठवण्यासाठी किंवा रासायनिक अभिक्रियांना गती देण्यासाठी केला जाऊ शकतो. विजेत्याला १०.३ कोटी, एक सुवर्णपदक आणि एक प्रमाणपत्र मिळेल.

## अजित पवारांनी साप पोसलेत

जरांगेंची टीका



■ **वृत्तसंस्था**
**छत्रपती संभाजीनगर, दि. ८ :**
ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांच्यावर मनोज जरांगे पाटील यांनी आज थेट आणि गंभीर आरोप करत हल्लाबोल केला आहे. ओबीसी समाजाला लहान भाऊ मानणाऱ्या मराठ्यांविरोधात भुजबळ यांनी विनाकारण एक 'टोळी' निर्माण केली असून, या टोळीच्या माध्यमातून मराठा समाजावर शत्रुत्वाची भूमिका पार पाडत असल्याचा आरोप जरांगे यांनी केला आहे.

अजित पवारांच्या पक्षाचे जास्त नेते मराठा समाजाच्या विरोधात काम करतात, असा आरोप त्यांनी केला. तुम्ही साप पोसले आहे, एक दिवस तुम्हाला आमचा शब्द खरा वाटेल, असा इशाराही मनोज जरांगेंनी अजित पवारांना दिला.

जरांगे यांनी आज छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलताना त्यांनी ओबीसी नेत्यांवर जोरदार टीका करत मराठा समाजाला सावध राहण्याचे आवाहन केले. ते म्हणाले आम्ही ओबीसींना आमचे लहान भाऊ, मोठे भाऊ समजायचो. परंतु, यांनी विनाकारण मराठ्यांच्या विरोधात एक टोळी निर्माण केली आणि त्या टोळीच्या माध्यमातून मराठा समाजावर शत्रुताची भूमिका पार पाडायला लागलेत.

महाराष्ट्रातील मराठा समाज शेती व्यवसाय करणारा आहे. आपल्याला नोकरी आधार पाहिजे. आपल्याला शिक्षण आणि नोकरी मिळू नये, अशी त्यांची भूमिका आहे. तर मराठ्यांना उच्च शिक्षण, नोकरी मिळाली पाहिजे, अशी माझी भूमिका असल्याचे जरांगे यावेळी म्हणाले.

## फटाक्याच्या कारखान्याला आग

# ६ ठार, अनेक जखमी



■ **वृत्तसंस्था**
**रायावरम, दि. ८ :**
आंध्र प्रदेशातील डॉ. बी.आर. आंबेडकर कोनसीमा जिल्ह्यातील रायावरम येथील एका फटाक्याच्या कारखान्यात बुधवारी भीषण आग लागली. या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. गंभीर जळालेल्या मृतदेहांची ओळख पटवणे कठीण आहे. अनेक लोक जखमी आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

पोलिस अधीक्षक राहुल मीणा यांनी सांगितले की, अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांचे मृतदेह मोठ्या प्रमाणात जळाले होते. मृतांमध्ये फटाके कारखान्यातील कामगार असण्याची शक्यता आहे.

मृतदेहांची ओळख पटवली जात आहे. बचावकार्य सुरू आहे. फटाके कारखान्याकडे उत्पादन परवाना होता.

स्थानिक माध्यमांच्या वृत्तानुसार, फटाके बनवताना शॉर्ट सर्किटमुळे आग लागली असावी. मृतदेह खूप जळाले होते आणि त्यांची ओळख पटवणेही कठीण होते.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की त्यांनी अनेक स्फोटांचे आवाज ऐकले.या घटनेचे अनेक व्हिडिओ समोर आले आहेत. एका व्हिडिओमध्ये संपूर्ण कारखाना आगीत वेढलेला दिसतो. दुसऱ्या व्हिडिओमध्ये एका माणसाचा मृतदेह पूर्णपणे जळालेला दिसतो. दूरवरून रेकॉर्ड केलेल्या व्हिडिओमध्ये कारखान्यातून धुराचे लोट उंच उठताना दिसत आहेत. या घटनेदरम्यान अनेक स्फोटही झाले.

मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी अधिकाऱ्यांना घटनास्थळी जाण्याचे निर्देश दिले आहेत. मी अपघाताची कारणे, सध्याची परिस्थिती, वैद्यकीय मदत याबद्दल अधिकाऱ्यांशी बोललो आहे, असे त्यांनी एका पोस्टमध्ये नमूद केले आहे.

# गडचिरोलीत व्यसनमुक्तीचा नवा आदर्श




■ **महासागर प्रतिनिधी**
**गडचिरोली, दि. ८ :**
गडचिरोली जिल्ह्यात तंबाखू आणि दारूमुक्तीसाठी राबविण्यात येत असलेल्या मुक्तीपथ अभियानाने संपूर्ण देशात एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

या अभियानामुळे गडचिरोली जिल्ह्यातील १५०० गावांपैकी ७१० गावांत दारूविक्री पूर्णपणे बंद आहे. सर्च संस्थेच्या प्रस्तावानुसार २०१६ मधे तत्कालीन मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी या अभियानाला हिरवी झेंडी दाखवली व हे काम जिल्ह्यात प्रशासन व सर्च संस्थेद्वारा सुरू झाले.

पूर्ण जिल्ह्यातील दारू सेवनाच्या प्रमाणात ३५ टक्के व तंबाखू सेवनाच्या प्रमाणात २५ टक्के अशी लक्षणीय घट झाली आहे. या परिणामातून मागील ९ वर्षात ५५१०२ पुरुषांनी दारू पिणे थांबवले आहे. जिल्ह्यात विषारी दारू पीवून मृत्यूचे प्रमाण शून्य आहे. अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे २०२४-२५ या वर्षात जिल्ह्यात अवैध दारू वरील होणाऱ्या खर्चामध्ये ६२.९ कोटी बचत झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच तंबाखू सेवनावरील खर्चात १०३.१ कोटी रुपये वाचले आहेत.




## ईडीची मुंबईत ८ ठिकाणी छापेमारी

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ८ :**
अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमशी संबंधित असलेल्या सलीम डोलाच्या आंतरराष्ट्रीय ड्रग्ज सिंडिकेटवर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) आज पहाटेपासून मोठी कारवाई सुरू केली आहे. मुंबई झोन वनच्या ईडी पथकाकडून मुंबईसह देशभरात १५ ठिकाणी ही छापेमारीची कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान ड्रग्ज तस्करी मधील मोठं नाव असलेला सलीम डोला सध्या भारताबाहेर आहे. मात्र, त्याच्या नेटवर्कच्या माध्यमातून एमडी ड्रग्जची तस्करी सुरू होती. या प्रकरणी ईडीने मनी लॉन्ड्रींगचा गुन्हा दाखल केला आहे. डोला हा दाऊद टोळीशी संबंधित असून, त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत.

## धनुष्यबाण कुणाचा? पुन्हा तारीख!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**
महाराष्ट्राच्या राजकारणात कळीचा मुद्दा ठरलेल्या शिवसेना पक्षचिन्ह वादावरील पुढील सुनावणी १२ नोव्हेंबर रोजी होणार आहे. आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली.



हे प्रकरण न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर १६ नंबरला सुनावणीसाठी आले होते. यावेळी उद्धव ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी खंडपीठाकडे पुढील तारीख मागितली. सिब्बलांच्या मागणीनंतर सुप्रीम कोर्टाने अंतिम सुनावणीसाठी १२ नोव्हेंबर तारीख दिली.

शिवसेनेमध्ये फूट पडल्यानंतर निवडणूक आयोगाने शिवसेनेचे पक्षचिन्ह ह्लधनुष्यबाणह्व आणि पक्षनाव ह्लशिवसेनाह्व हे एकनाथ शिंदे गटाला दिले होते. उद्धव ठाकरे गटाने निवडणूक आयोगाच्या निर्णयावर आक्षेप घेत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. निवडणूक आयोगाचा निर्णय बेकायदेशीर आणि घटनाबाह्य असल्याचा दावा ठाकरे गटाने केला आहे. याआधी न्यायालयाने या प्रकरणावर काही प्राथमिक सुनावण्या घेतल्या असून, आता अंतिम टप्प्याकडे सुनावणी पोहोचत आहे.

आज न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू होताच ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद करण्यास सुरुवात केली. सिब्बल यांनी तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली.

जानेवारी महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत, त्यामुळे या प्रकरणाची सुनावणी लवकरात लवकर घ्यावी, असे त्यांनी कोर्टात सांगितले.

सिब्बल यांचा युक्तिवाद सुरू असताना दुसरे वकील वारंवार मध्यस्थी करत असल्याने त्यांना थांबवले. आधीच खूप वेळ गेला आहे, आता सुनावणी घ्या, असे त्यांनी न्यायालयासमोर आग्रहाने म्हटले. या युक्तिवादासाठी सिब्बल यांनी कमीत कमी ४५ मिनिटांचा वेळ मागितला. यावर न्यायालयाने पुढील सुनावणीसाठी १२ नोव्हेंबर ही तारीख दिली.

## ३०० सिलिंडर असलेल्या ट्रकमध्ये भीषण स्फोट

■ **वृत्तसंस्था, दुडू (जयपूर), दि. ८ :**
मंगळवारी रात्री उशिरा जयपूर-अजमेर महामार्गावर एका रासायनिक टँकरची एलपीजी गॅस सिलिंडरने भरलेल्या ट्रकशी टक्कर झाली. यामुळे टँकरच्या केबिनमध्ये आग लागली. आग सिलिंडरपर्यंत पोहोचताच त्यांचा स्फोट झाला.

एकामागून एक २०० सिलिंडरचा स्फोट झाला. काही ५०० मीटर अंतरावर शेतात पडले. १० किलोमीटर अंतरापर्यंत स्फोटांचे आवाज ऐकू आले. सुमारे दोन तास सिलिंडरचा स्फोट होत राहिला. या अपघातात एक व्यक्ती जिवंत जळाली. १२ अग्निशमन दलाच्या गाड्यांनी तीन तासांनंतर आग आटोक्यात आणली. ट्रकमध्ये अंदाजे ३३० सिलेंडर होते. एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, आरटीओ गाडी पाहून टँकर चालकाने गाडी ढाब्याकडे वळवली. यादरम्यान, ती गॅस सिलेंडरने भरलेल्या ट्रकला धडकली.

जयपूरमधील दुडू येथील मोखमपुराजवळ हा अपघात झाला. पाच पार्क केलेल्या वाहनांनाही आग लागली. या घटनेनंतर महामार्गाच्या दोन्ही बाजूंची वाहतूक ठप्प झाली. बुधवारी पहाटे महामार्ग पुन्हा सुरू करण्यात आला.

# शेतकरी आर्थिकदृष्ट्या १० वर्षे मागे : रोहित पवार



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सरकारने खरवडून गेलेल्या जमिनीसाठी केलेली हेक्टरी 47 हजार रुपयांच्या मदतीने काहीच होणार नसल्याचा दावा केला आहे. विशेषतः या अस्मानी संकटामुळे त्यांनी बळीराजा 10 वर्षे मागे जाण्याची भीती व्यक्त केल्यामुळे चिंता वाढली आहे. यंदा राज्यात विशेषतः मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी हा पुरामुळे खरवडून गेल्या आहेत. त्यामुळे तिथे पीकपाणी कसे घ्यायचे? हा प्रश्न त्यांच्यापुढे उभा टाकला आहे. सरकारने या प्रकरणी एक विशेष पॅकेज जाहीर केले आहे. पण यामुळे काहीच होणार नसल्याचा दावा आमदार रोहित पवार यांनी केला आहे. ते म्हणाले, खरवडून गेलेल्या जमीनीसाठी 47 हजार रु. राज्यातील 60 हजार हेक्टरहून अधिक जमीन वाहून गेली. जमीन वाहून गेली म्हणजे काय, याचा अर्थ प्रत्यक्ष पाहिल्यानंतरच कळतो. नद्यांनी पात्र बदलली असून मूळ प्रवाह सोडून शेजारच्या शेतातून नदी तयार झाली. हे होत असताना दोन्ही बाजूने अगदी दहा-बारा फुटापर्यंत खोल माती वाहून गेली आणि खाली मुरूम उघडा पडला. अनेक ठिकाणी तर शेतातच नदी तयार झाल्याने त्यांना हेक्टरी 4-5 लाख रुपये दिले तरी नदीचं पात्र कसं बदलणार, असा प्रश्न निर्माण होतो.

# इज ऑफ डूईंग बिझनेस धोरणामुळे

# महाराष्ट्रात उद्योजकांसाठी पोषक वातावरण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**

राज्य शासन इज ऑफ डूईंग बिझनेस धोरण राबवित आहे. या माध्यमातून गुंतवणूकदारांच्या समस्या निकालात काढण्याचे शासनाचे धोरण आहे. यामुळे महाराष्ट्रातील गुंतवणूक फायदेशीर आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक उद्योगस्नेही राज्य असून दळणवळणाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध आहेत. शिक्षण क्षेत्रातही विविध देशातील उत्कृष्ट विद्यापीठांसोबत भागीदारी करण्यात आली असून मोठ्या प्रमाणावर कुशल मनुष्यबळ तयार होत आहे. राज्यात उद्योगांसाठी पोषक वातावरण असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

हॉटेल ताज पॅलेस येथे मुख्यमंत्री फडणवीस यांनी ब्रिटिश शिष्टमंडळाची भेट घेतली. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील गुंतवणूक वातावरण, पायाभूत सुविधा आणि भावी विकास आराखड्याबाबत सविस्तर माहिती दिली. ज्याप्रमाणे लंडन म्हणजे युकेची ओळख आहे, त्याचप्रमाणे मुंबई म्हणजे महाराष्ट्र आणि महाराष्ट्र म्हणजे भारत अशी ओळख असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, इज ऑफ डूईंग बिझनेस धोरणामुळे उद्योग परवाने मिळविण्याची प्रक्रिया अधिक सोपी झाली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

गुंतवणूकदारांच्या समस्या सोडविण्यासाठी वॉर रूम स्थापन करण्यात आली असून दर महिन्याला त्याचा आढावा घेतला जातो. राज्यात उद्योग, वित्त, शिक्षण, नगरविकास आणि तंत्रज्ञान या सर्वच क्षेत्रांत गुंतवणुकीसाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत.

देशाच्या शिक्षण क्षेत्रात नवे धोरण राबविले असून परदेशी विद्यापीठांसाठी प्रवेशद्वार खुले केले आहे. त्या अंतर्गत राज्यात नवी मुंबई येथे एज्यु सिटी उभारण्यात येत आहे, ज्यामध्ये लंडन विद्यापीठाचा कॅम्पस असणार असून येथे दोन हजार विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय केली जाणार आहे. नवी मुंबई विमानतळ, सी-लिंक आणि तिसरी मुंबई या प्रकल्पांच्या माध्यमातून राज्यात आधुनिक शहरी विकास होत आहे. वाढवण बंदर विकसित केले जात असून याठिकाणी बुलेट ट्रेन स्थानक आणि ग्रीन इंडस्ट्रियल झोनच्या माध्यमातून हा परिसर चौथी मुंबई म्हणून विकसित होत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर हे ईव्ही हब बनत आहे, नागपूर सोलर मॉड्यूल उत्पादन केंद्र बनत आहे, तर पुणे हे उद्योगांचे प्रमुख केंद्र आहे. महाराष्ट्र देशातील स्टार्टअप्स आणि गुंतवणुकीत आघाडीवर आहे. इन्फ्रास्ट्रक्चर विकासामुळे भारत आज गुंतवणूक स्नेही देश बनला असल्याचे सांगत त्यांनी प्रशासनात पारदर्शकता वाढल्याचे नमूद केले. स्ट्रीट व्हेंडर्सनी डिजिटल व्यवहार स्वीकारले आहेत. जगातील सर्वाधिक डिजिटल व्यवहार भारतात होत आहेत, याचे श्रेय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आहे, २०३० पर्यंत ५० टक्के पुनर्वापर ऊर्जा वापराचे उद्दिष्ट ठेवले आहे. महाराष्ट्रात सौर ऊर्जेला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जात आहे. राज्यात डेटा सेंटर, एआय आणि क्वांटम टेक्नॉलॉजीसाठी पुण्यात विशेष व्यवस्था उभारली जात आहे. स्किल विद्यापीठांमार्फत एचपी सारख्या आंतरराष्ट्रीय भागीदारांबरोबर तज्ज्ञ घडविण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. फिनटेक आणि फायनान्स कंपन्यांचे माहेरघर म्हणजे मुंबई आहे. ब्रिटन आणि भारतातील भागीदारी आणखी दृढ व्हावी, यासाठी प्रयत्नशील असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## वेगवेगळ्या अपघातांत दोन दुचाकीस्वाराचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी**
**पुणे, दि. ८ :**

पुणे शहरात दोन वेगवेगळ्या अपघातांमध्ये दोन दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे. हडपसर आणि कोंढवा परिसरात या घटना घडल्या. कोंढवा भागात भरधाव दुचाकी समोरून येणाऱ्या वाहनावर आदळल्याने शानुर युनूस बागवान (वय 41, रा. नवाजीश पार्क, कोंढवा) यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बागवान हे लुल्लानगर भागातून ज्योती हॉटेल चौकाकडे जात असताना गतिरोधकांवर त्यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले. त्यांची दुचाकी एका वाहनावर आदळली. या अपघातात बागवान यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. सहायक पोलीस निरीक्षक एन जाधव या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. दुसऱ्या घटनेत, हडपसर-सासवड रस्त्यावर भरधाव वाहनाच्या धडकेत दिनेश श्रीराम सिरसाठ (वय 38) या दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. गणेश श्रीराम सिरसाठ (वय 49, रा. मंगरूळ, ता. चिखली, जि. बुलडाणा) यांनी याप्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनेश सिरसाठ हे हडपसर-सासवड रस्त्याने जात असताना सातववाडी पीएमपी थांब्यासमोर एका भरधाव वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.

## बोईसर रेल्वे स्थानकाजवळ भुयारी मार्ग उभारण्यासाठी प्रस्ताव सादर करा



गणेश नाईक यांचे निर्देश

**मुंबई :** पालघर जिल्ह्यातील बोईसर रेल्वेस्थानकाजवळ उड्डाणपूल व भुयारी मार्गाचे काम करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने मार्ग काढावा. तसेच भुयारी मार्गासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निधी मिळण्यासाठी राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश वन मंत्री तथा पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी दिले. बोईसर येथील रेल्वे लेव्हल क्रॉसिंग फाटक बंद करून तेथे उड्डाणपूल व भुयारी मार्ग बांधण्यासंदर्भात वन मंत्री तथा पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाली. यावेळी खासदार डॉ. हेमंत सावरा, आमदार राजेंद्र गावित, आमदार विलास तरे, पालघर जिल्हाधिकारी इंदुमती जाखड, डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडचे महाव्यवस्थापक विकास कुमार यांच्यासह, रेल्वे विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बोईसर रेल्वे स्थानक येथील लेव्हल क्रॉसिंग फाटक बंद करून रेल्वे उड्डाणपूल (आरओवी) उभारण्याबरोबरच भुयारी मार्ग बांधण्याची मागणी नागरिकांनी केली होती. उड्डाणपुलाचे आरेखन करताना तेथील काही आदिवासी पाड्यांना विस्थापित होत असल्याने नागरिकांचा त्याला विरोध होता.

# संपूर्ण कर्ज मुक्तीची घोषणा करा

## शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने संभाजीनगरमध्ये हंबरडा मोर्चा

■ **महासागर प्रतिनिधी,**
**छत्रपती संभाजीनगर, दि. ८ :**

सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे संपूर्ण महाराष्ट्रात 6 लाख हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी तुटपुंजी मदत जाहीर केली असल्याचा आरोप शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे. त्यामुळेच छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हाधिकारी आणि तहसील कार्यालयावर पक्षाच्या वतीने हंबरडा मोर्चा काढण्यात आला.

अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसानी साठी शेतकऱ्यांना हेक्टरी रुपये 50 हजार इतकी थेट आर्थिक मदत त्वरित जाहीर करावी. नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्जमुक्त करावे. पीक विम्याचे कठीण निकष पूर्ववत करून विम्याची रक्कम त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी.



अतिवृष्टीमुळे घरे व पशुधनाचे नुकसान झालेल्या नागरिकांना, जुने निकष न लावता, योग्य आणि पुरेसा मोबदला त्वरित देण्यात यावा, या मागण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले आहे.

शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष संभाजीनगरच्या वतीने हे निवेदन सादर केले जात आहे. मागील सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीचे महाप्रलयकारी संकट संभाजीनगर जिल्ह्यातील शेतकरी बांधवांच्या माथ्यावर कोसळलेले आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यांदेखत शेती वाहून गेली, उभी पीके सडली आणि होत्याचे नव्हते झाले. ही नैसर्गिक आपत्ती असली तरी, या संकटाच्या वेळी राज्य शासनाची उदासीनता आणि प्रशासनाचा दुर्लक्षपणा संभाजीनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा ठरलेला आहे. अतिवृष्टीने संपूर्ण संभाजीनगर जिल्ह्यातील शेती पूर्णतः उद्ध्वस्त झाली आहे.

## सरन्यायाधीशांवरील हल्ल्याचा निषेध

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ८ :**

भारताचे सरन्यायाधीश, महाराष्ट्राचे सुपुत्र, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर चालणारे न्या. बी.आर. गवई यांच्यावर न्यायालयात झालेला हल्ला अत्यंत निंदनीय आहे.शासन पुरस्कृत धर्मांध शक्तींना मिळालेली मोकळीक आता थेट न्यायपालिकेवर हल्ला करत आहेत. हा हल्ला केवळ एका व्यक्तीवर नसून भारताच्या सामाजिक समतेवर, संविधानावर झालेला हल्ला आहे. याचा निषेध व्यक्त करण्यासाठी शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आंदोलन

या आंदोलनाच्या माध्यमातून धर्मांध शक्तींना बळ देणाऱ्या व संविधानिक मूल्यांना कमकुवत करणाऱ्या सरकारचा, माननीय सरन्यायाधीशांवर हल्ला करणाऱ्या व्यक्तींचा निषेध करण्यात आला. "हा हल्ला केवळ एका व्यक्तीवरील नसून, हा संविधानावर झालेला हल्ला आहे, हा देशाच्या सामाजिक समतेवर झालेला हल्ला आहे, दलित समाजावर धर्मांध शक्तीने केलेला हल्ला आहे. ज्याने हे दुष्कृत्य केले त्याने माफी न मागता हल्ला समर्थन केले हे खेदजनक आहे.अशा प्रवृत्ती वाढत असून त्यांना रोखणे आवश्यक आहे" अशी प्रतिक्रिया प्रशांत जगताप यांनी व्यक्त केली.

यावेळी प्रशांत जगताप यांच्यासह राष्ट्रीय युवती अध्यक्षा सक्षना सलगर, पंडीत कांबळे, मनाली भिलारे, भगवानराव साळुंखे, सुनील माने, किशोर कांबळे, आशा साने, पांडुरंग लव्हे, अजिंक्य पालकर, गणेश नलावडे, शैलेंद्र भेल्हेकर, मजहर माणियार, लखन वाघमारे, अर्जुन गांजे तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## राज्य सरकारने दिशाभूल केली

### अंबादास दानवे यांचा गंभीर आरोप



**छत्रपती संभाजीनगरः** राज्य सरकारने सप्टेंबर महिन्यात राज्यात झालेल्या अतिवृष्टीसाठी जाहीर केलेली ३१ हजार ६२८ कोटी रुपयांची मदत शेतकऱ्यांची संपूर्णपणे दिशाभूल करणारी असल्याचा गंभीर आरोप शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी केला. या मदती मध्ये प्रामुख्याने यापूर्वी दिलेले २ हजार २०० कोटी रुपये, पिक विम्याचे ५ हजार कोटी रुपये, पिक नुकसानीचे एनडीआरएफ निकषाप्रमाणे ६ हजार १७५ कोटी रुपये, पिक नुकसान राज्य सरकारची मदत ६ हजार ५०० कोटी रुपये, पायाभूत सुविधा १० हजार कोटी रुपये आणि जीवित व वित्तहानी १७५३ कोटी रुपये असे एकूण ३१ हजार ६२८ कोटी रुपये होतात, असल्याची माहिती दानवे यांनी पत्रकार संभाजीनगर येथे आयोजित परिषदेत दिली. यापूर्वी जाहीर केलेली मदत सदरील पॅकेज मध्ये समाविष्ट करण्याची आवश्यकता नव्हती. विमा विषयी राज्य सरकारने हमी दिली असली तरीही विमा कधी मिळेल याची शाश्वती नाही. विमा कंपन्यांच्या कारभाराची पार्श्वभूमी बघता सदरील विमा मिळणे अशक्यच असल्याचे अंबादास दानवे यावेळी म्हणाले. पिक विम्याची रक्कम फक्त ४५ लाख शेतकऱ्यांनी भरलेल्या विमा धारकांना मिळणार आहे. राज्य सरकारकडे किती शेतकऱ्यांनी विमा भरलेला आहे याची माहिती राज्य सरकारकडे नाही. एनडीआरएफ निकषाप्रमाणे ६ हजार १७५ कोटी रुपये राज्य सरकार देत असले तरीही यामध्ये सरकारचे मोठे कर्तृत्व नाही.

## मुंबईत ई-कॉमर्स फसवणुकीचा पदार्फाश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**

पार्सल स्टिकर्स बदलून ई-कॉमर्स कंपनीला ३४ लाख रुपयांपेक्षा जास्त फसवणूक करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीतील चार जणांना मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी सांगितले की आरोपी ई-कॉमर्स कंपनीच्या वेबसाइटवरून एकाच वेळी एक महागडा आणि दोन स्वस्त इलेक्ट्रॉनिक वस्तू ऑर्डर करायचे.

दिलेल्या पत्त्यावर ऑर्डर मिळण्याऐवजी, ते डिलिव्हरी बॉयसोबत कट रचायचे आणि प्रवासादरम्यान वस्तू उचलायचे. त्यानंतर ते पार्सलमधून स्टिकर्स (किंमत इत्यादी उत्पादनांचे तपशील) काढून टाकायचे. त्यानंतर ते महागड्या वस्तूंवर स्वस्त वस्तूंचे स्टिकर्स आणि स्वस्त वस्तूंवर महागड्या वस्तूंचे स्टिकर्स चिकटवायचे. त्यानंतर ते स्वस्त वस्तू ई-कॉमर्स कंपनीला परत करायचे आणि महागड्या वस्तू ठेवायचे. या पद्धतीने, टोळीने ई-कॉमर्स कंपनीला लाखो रुपयांची फसवणूक केली. सोमवारी, गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांना माहिती मिळाली की टोळीचे सदस्य मुंबईतील बोरिवली येथे ऑर्डर घेण्यासाठी येत आहेत. पोलिसांनी बोरिवली (पश्चिम) येथे हरियाणा आणि छत्तीसगडमधील चार टोळी सदस्यांना अटक केली.

## दिवाळीसाठी पुणे विभागातून जादा बसेस सोडणार

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ८ :**

दिवाळीचा उत्सव जवळ आला असून, अनेकजण आपल्या गावी जाऊन कुटुंबासोबत दिवाळी साजरी करण्याची तयारी करत आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात नोकरी, शिक्षण किंवा व्यवसायासाठी स्थायिक असलेले नागरिक दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या संख्येने आपल्या गावाकडे रवाना होणार आहेत. या पार्श्वभूमीवर परिवहन महामंडळाच्या पुणे विभागाने एकूण 598 जादा एसटी बस सोडण्याचा निर्णय घेतला आहे. या जादा बस 15 ऑक्टोबर ते 5 नोव्हेंबर या कालावधीत सोडण्यात येणार आहेत. त्यामुळे हजारो प्रवाशांना आपल्या गावी जाण्यासाठी सोयीस्कर व्यवस्था उपलब्ध होणार आहे.

यंदा पहिल्यांदाच पिंपरी-चिंचवड आगारातून विशेष एसटी बस सेवा सुरू करण्यात येत आहे. पिंपरी-चिंचवड परिसरातून मोठ्या संख्येने प्रवासी थेट गावी जाऊ शकतील. याशिवाय शिवाजीनगर आणि स्वारगेट या प्रमुख आगारांमधूनही जादा बस सोडण्यात येणार आहेत. या जादा बसद्वारे कोल्हापूर,



सांगली, सातारा, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, लातूर, बीड, परभणी, अकोला, आणि नागपूरसह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांकडे सेवा पुरवली जाणार आहे. पुणे विभागातून ही अतिरिक्त बसची सोय खालीलप्रमाणे उपलब्ध असेल.

एसटी महामंडळाने या जादा बसचे ऑनलाईन आरक्षण सुरू केले आहे. त्यामुळे रेल्वेचे तिकीट न मिळालेल्या प्रवाशांना हा एक उत्तम पर्याय उपलब्ध झाला आहे. प्रवासी एसटी महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा त्यांच्या मोबाइल ॲपवरून आपल्या प्रवासाचे तिकीट सहज बुक करू शकतात. गर्दी आणि ऐनवेळी होणारी गैरसोय टाळण्यासाठी प्रवाशांनी आधीच आरक्षण करण्याचे आवाहन महामंडळाने केले आहे.

दरम्यान, राज्यात निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे दिवाळीच्या हंगामात एसटी महामंडळाने केलेली 10 टक्के हंगामी भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही दरवाढ रद्द करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले होते. साधी, निमआराम (हिरकणी), शयन आसनी, वातानुकूलित शिवशाही आणि जनशिवनेरी अशा सर्व प्रकारच्या बसगाड्यांना ही वाढ लागू होणार होती.

## उंच इमारतीवरून वीट डोक्यात पडून तरुणी ठार


■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ८ :**



बांधकाम सुरू असलेल्या एका इमारतीवरून खाली पडलेली एक वीट थेट डोक्यात पडल्यामुळे एका 22 वर्षीय तरुणीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मुंबईच्या जोगेश्वरी परिसरात घडली आहे. मृत तरुणी नियमितपणे या भागातून आपल्या नोकरीला जात होती. पण रस्त्यातच मृत्यूने तिला गाठल्यामुळे हळहळ व्यक्त केली जात आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, संस्कृती अनिल अमिन असे मृत तरुणीचे नाव आहे. ती आज सकाळी 9.30 च्या सुमारास जोगेश्वरी पूर्व भागातील मजासवाडी परिसरातून जात होती. या भागात एका इमारतीचे बांधकाम सुरू आहे. संस्कृती या इमारतीजवळ येताच या इमारतीवरून एक वीट (सिमेंट ब्लॉक) खाली पडली. ही वीट थेट संस्कृतीच्या डोक्यात पडल्यामुळे ती जागीच मृत्युमुखी पडली. या घटनेची माहिती मिळताच मेघवाडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी मुलीचे पार्थिव ताब्यात घेत पुढील सोपस्कारासाठी रुग्णालयात पाठवले. या प्रकरणी पुढील तपास केला जात आहे.

## हिंदी विद्यापीठात बाबासाहेबांचा अपमान



प्रकाश आंबेडकरांनी केली कारवाईची मागणी

**मुंबई :** वर्धा स्थित महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या विधी विभागाच्या फ्रेशर पार्टीत काही असमाजिक विद्यार्थ्यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याची घटना घडली आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी एका ट्विटद्वारे ही घटना समोर आणली असून, त्यांनी आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. वर्धा स्थित महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठात गत 26 सप्टेंबर रोजी फ्रेशर पार्टी झाली होती. या पार्टीत अश्लिल शिवीगाळ करत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान झाल्याची घटना घडली आहे. प्रकाश आंबेडकरांनी या घटनेची गंभीर दखल घेत आरोपींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. आंबेडकर आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाले, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा (महाराष्ट्र) च्या विधी विभागाच्या फ्रेशर पार्टीत काही असामाजिक विद्यार्थ्यांनी संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला. विद्यापीठाच्या काही विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांना बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो द्यावयाचा होता. वंचित बहुजन आघाडीची विद्यार्थी संघटना असलेल्या सम्यक विद्यार्थी आंदोलनाने हा मुद्दा उपस्थित करत विद्यापीठ प्रशासनाकडे कारवाईची मागणी केली आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. विद्यापीठ प्रशासनाने हे प्रकरण गांभीयार्ने घ्यावे. दोषींवर कठोर कारवाई करावी.

## पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी शासनाचा दिलासा

# परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**

राज्यातील बहुतांश भागात मुसळधार पाऊस झाला आहे. पुरामुळे कागदपत्रे, शैक्षणिक साहित्य वाहून गेलेल्या एकाही विद्यार्थ्याचे शिक्षण बाधित होणार नाही, याची दक्षता घेतली जात असून परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सोबतच शैक्षणिक संस्थांनीही सामाजिक जबाबदारी म्हणून विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले आहे.

मंत्रालयात राज्यातील पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणींचा आढावा घेण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीला उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर,



तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उपसचिव प्रताप लुबाळ, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. अजय भामरे, तसेच राज्यातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, अनेक विद्यार्थ्यांचे साहित्य आणि शैक्षणिक साधने पुरामुळे नष्ट झाली आहेत. त्यामुळे महाविद्यालये, विद्यापीठे आणि खासगी शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, गणवेश अशा स्वरूपात सामाजिक कर्तव्य म्हणून मदत करावी. यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल.

# समर्थ सहकारी बँकेच्या खात्यातून पैसे काढण्यास मनाई

■ **महासागर प्रतिनिधी, सोलापूर, दि. ८ :**

आरबीआयचे निर्बंध नेमके काय?

सोलापुरातील समर्थ सहकारी बँकेवर भारतीय रिझर्व्ह बँकेने घातलेल्या निबंधांमुळे ठेवीदारांमध्ये आज मोठी खळबळ उडाली आहे. सकाळपासूनच बँकेसमोर मोठी गर्दी जमली असून ठेवीदारांना आपली ठेव परत मिळावी यासाठी गोंधळाचे आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर बँकेत पैसे अडकल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

आरबीआयच्या आदेशानंतर समर्थ बँकेतील कोणतीही ठेव काढता येणार नाही, असे बँक कर्मचाऱ्यांनी ठेवीदारांना सांगितल्यावर ठेवीदारांचा संताप अनावर झाला. आम्हाला आमचे पैसे द्या, नाहीतर बँकेत तोडफोड करू, अशा आक्रोशात काही ठेवीदारांनी संतप्त प्रतिक्रिया दिल्या. अनेक ठेवीदारांनी बँकेसमोरच आंदोलन सुरू केले.

बँक कर्मचाऱ्यांनी ठेवीदारांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, मात्र कोणतीही ठोस हमी न मिळाल्याने नागरिक संतप्त झाले. मागच्या हंगामातील उसाचे पैसे नुकतेच खात्यात आले होते. आता तेच अडकले आहेत. घर चालवायचे कसे?, अशी हताश प्रतिक्रिया एका शेतकरी ठेवीदाराने दिली. काही ठेवीदारांनी औषधी, रुग्णालयाचे बिल, मुलांचे शिक्षण आणि घरखर्च या सर्वांसाठी बँकेतील रकमेवर अवलंबून असल्याचे सांगितले.

**आरबीआयचे निर्बंध नेमके काय?**

आरबीआयने समर्थ सहकारी बँकेवर सहा महिन्यांसाठी निर्बंध लागू केले आहेत. या कालावधीत आरबीआयची पूर्वपरवानगी न घेता बँक कोणतेही नवे कर्ज देऊ शकणार नाही, ठेवी स्वीकारू शकणार नाही, तसेच कोणतीही मालमत्ता विक्री किंवा हस्तांतर करू शकणार नाही.

तसेच, ठेवीदारांना त्यांच्या खात्यातून पैसे काढण्यास देखील मनाई करण्यात आली आहे. तथापि, आरबीआयने स्पष्ट केले आहे की ठेवीदारांना डीआयसीजीसी योजनेअंतर्गत त्यांच्या ठेवीवर 5 लाखांपर्यंत विमा मिळू शकतो. मात्र या प्रक्रियेला वेळ लागणार असल्याने ठेवीदारांमध्ये अनिश्चिततेचे सावट आहे.

# पुन्हा एकदा शिक्षणावर संकट

■ अमरावतीतील 450 शाळा कायमस्वरूपी होणार बंद ?

■ विद्यार्थ्यांचे अन्य शाळांमध्ये करणार समायोजन

### शिक्षण आयुक्तांचा निर्णय

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.8)**– एकाच परिसरामध्ये (कॅम्पस) असलेल्या 0 (शुन्य) ते 5 पटसंख्येच्या शाळा कायमस्वरूपी बंद करण्याचे आदेश दिले आहेत. हा निर्णय आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या 07 ऑक्टोबर 2025 रोजीच्या आभासी सभेत दिलेल्या निर्देशांनुसार घेण्यात आला. त्यामूळे अमरावती जिल्ह्यातील अंदाजे 450 च्यावर शाळा कायमस्वरुपी बंद पडण्याची भीती निर्माण झाली आहे. या शाळा बंद पडल्यास ८00 शिक्षक अतिरीक्त ठरतील.

निर्देशानुसार, एकाच कॅम्पस मधील अनेक शाळा एकत्र करून एकाच शाळेत रुपांतरित करण्यात येणार आहे. बंद करण्यात आलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे नजिकच्या शाळेत समायोजन करणे आवश्यक आहे.



### विद्यार्थ्यांना देणार वाहतूक भत्ता

समावेश झालेल्या विद्यार्थ्यांना आवश्यक असल्यास दरमहा 600 रुपयांपर्यंत वाहतुक भत्ता देण्याची व्यवस्था करण्याचा प्रस्ताव तात्काळ संबंधित कार्यालयास सादर करावा, असे आदेश दिले गेले आहेत. शासनाच्या शुध्दीपत्रकानुसार स्वतंत्र कन्या शाळांचे सहशिक्षणात रुपांतर करण्यासही तात्काळ कार्यवाही करणे अनिवार्य आहे. तसेच, बंद करण्यात आलेल्या शाळांचा युडायस क्रमांक तात्काळ नोंदविण्याचे आदेश देखील देण्यात आले आहेत.

### सर्व सरकारी शाळांना आदेश

अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ आणि बुलढाणा जिल्ह्यांच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अधिकाऱ्यांना तसेच महानगरपालिका व नगर परिषदेच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना या आदेशांचे पालन करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी नवीन शाळांमध्ये समाविष्ट होतील, परंतु काही पालक आणि शिक्षकांना यामुळे वाहनभाडे, शाळेच्या अंतर व व्यवस्थापनाच्या बदलांबाबत चिंता व्यक्त होत आहे. प्रशासनाचे उद्दिष्ट शाळा एकत्र करून व्यवस्थापन सुधारण्याचे असून, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हा प्राथमिक हेतू आहे. मात्र ग्रामीण भागात हा निर्णय शिक्षणावर आलेल्या संकटाप्रमाणे असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.

राईट टू एज्युकेशन 2009 नुसार कोणतीही शाळा बंद करता येत नाही. या कायदा नुसार 1 की.मी.आत प्राथमिक शाळा तर 3 की.मी.अंतरावर माध्यमिक शाळा असणे आवश्यक आहे. मुलांना प्राथमिक शिक्षण गावातच मोफत व सक्तीने मिळाले पाहीजे. या धोरणामुळे ग्रामिण भागातील आणि वाडी, वस्त्या आणि तांड्यावरील मुल शिक्षणा पासुन वंचित राहणार, म्हणुन शासनाने कोणतीच शाळा बंद करु नये. वाहन भत्ता ही पोकळ घोषणा आहे. या धोरणा विरोधात प्राथमिक शिक्षक समिती आंदोलन उभारणार आहे.

**–राजेश सावरकर,राज्य प्रसिध्दी प्रमुख**
**म.रा.प्राथमिक शिक्षक समिती.**



माता न तू वैरिणी...

# अनैतीक प्रेमसंबंधाच्या आड येणाऱ्या मूलालाच संपविले

**चार आरोपी पोलिसांच्या ताब्यात | दत्तापुर पोलिसांची कारवाई**

**अमरावती, (दि. 8)**– आपल्या अनैतिक प्रेमसंबंधाच्या आड येणाऱ्या पोटच्या मुलाची हत्या केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. ही घटना आसेगाव शेत शिवारात घडली असून, दत्तापुर पोलिसांनी चार आरोपींना ताब्यात घेतले आहे. मृतकाचे नाव गणेश उर्फ शुभम गजानन वारंगणे (वय 26, रा. नारगावंडी, ह.मु. साई नगर, धामणगाव रेल्वे) असे असून, या घटनेबाबत मृतकाचा नातेवाईक उमेश रमेश एकडे (वय 40, रा. निमगाव, ता. नांदुरा, जि. बुलढाणा) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादीत म्हटले आहे की, मृतकाची आई आरोपी दुर्गा वारंगणे हिचे आरोपी मनोज एकनाथराव किर्तन (रा. वार्ड क्रमांक 8, दत्तापुर) याच्यासोबत प्रेमसंबंध होते. या संबंधाला मृतक शुभम विरोध करत असल्याने आरोपी मनोज आणि दुर्गा यांनी त्याचा काटा काढण्याचा कट रचला. त्यानुसार आरोपी मनोज किर्तन, अमोल अर्जुन (रा. जुना दत्तापुर) आणि अशोक चवरे (रा. नारगावंडी) यांनी शुभमला आमिष दाखवून शेतात नेले. तिथे त्याचे हातपाय दोरीने बांधून स्प्रिंकलरच्या लोखंडी पाइपाने निर्दय मारहाण केली. यात तो गंभीर जखमी होऊन मृत्यू पावला. ही घटना 7 ऑक्टोबरच्या संध्याकाळी घडली असून, दुसऱ्या दिवशी दुपारी मृतदेह आढळला. त्यानंतर दत्तापुर



पोलिसांनी फिर्यादीनुसार गुन्हा गुन्हा नोंदवून चारही आरोपींना ताब्यात घेतले आहे. सदर प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक गिरीश ताथोड़ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या कारवाईत पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गजानन गजभारे, पुंडलिक चव्हाण, पोलिस हवालदार अतुल पाटील, हरिहर वैद्य, दीपक पंधरे, सागर कदम, नवनाथ खेडकर, पवन हजारे, किरण पवार, निलीमा खडसे, मयुर ढवक आणि पियूष चौबे यांनी सक्रिय सहभाग घेतला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, आईच्या संगनमताने मुलाचा जीव घेण्यात आल्याने समाजमन हादरले आहे.

# अमरावती कारागृहात पुन्हा सापडले मोबाईल

### सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

### पोलीस कर्मचारी संशयाच्या भोवऱ्यात

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 8)** – अमरावती मध्यवर्ती कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेला पुन्हा धक्का बसला आहे. केवळ दोन दिवसांत तुरुंगातील कैद्यांकडून पाच मोबाईल फोन सापडल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी फ्रेझरपुरा पोलिसांनी संबंधित कैद्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकारामूळे कारागृह पोलीसमधील काही शिपाई व अधिकारी संशयाच्या भोवऱ्यात सापडले असल्याची माहिती आहे.

5 ऑक्टोबर रोजी अंडा सेलमध्ये घेतलेल्या झडतीत दोन कैदी तरबेज दरवेश खान आणि दस्तगीर गफूर यांच्या ताब्यातून तीन मोबाईल फोन (लावा, ॲपल, नोकिया) आणि दोन बॅटरी जप्त करण्यात आल्या. तुरुंग नियमांचे उल्लंघन करून या दोघांनी सुरक्षा धोक्यात आणल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेचा तपास सुरू असतानाच 7 ऑक्टोबर रोजी आणखी एका कैद्याकडे दोन मोबाईल फोन सापडले. त्यामुळे तुरुंगातील सुरक्षा यंत्रणेकडे पुन्हा एकदा संशयाने पाहिले जात आहे. या पार्श्वभूमीवर तुरुंग सुरक्षा समितीची विशेष बैठक घेण्यात आली. पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे आणि तुरुंग अधीक्षक कीर्ती चिंतामणी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत मोबाईल तुरुंगात कसे येतात आणि सुरक्षा वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाचा कसा वापर करता येईल यावर चर्चा करण्यात आली. घटनेचा उलगडा तेव्हा झाला, जेव्हा एक शिक्षाधीन बंदी काही दिवसांपासून कारागृहात व्हिडिओ शूटिंग केली आहे असे सांगत होता. त्यामुळे 5 ऑक्टोबर रोजी सकाळी 11.40 वाजता कारागृहातील अतिसुरक्षा विभागात विशेष झडती घेण्यात आली आणि त्यात मोबाईल फोन सापडले. या सलग घटनांमुळे कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पुढील काळात प्रशासनाने कठोर उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.



# 30 हून अधिक भक्तांनी घेतले 1 किलोमीटर पर्यंत लोटांगण

■ गोविंदा गोविंदा च्या जयघोषाणे चढले स्फुरण

■ अचलपूरात लोटांगण सोहाळ्याला शेकडो लोकांची उपस्थिती









महासागर | प्रतिनिधी

**अचलपूर,(दि.8)** – कोजागिरी पोर्णिमेच्या तिसऱ्या दिवशी म्हणजे बुधवारी (दि.8) पहाटेलाच सुर्याच्या पहिल्या किरणांसोबत येथील जीवनपूरा गोविंदा गोविंदा च्या जयघोषाने दुमदुमून गेला. मंगलवस्त्र धारण केलेले महिला–पुरुष, हातामध्ये आरतीचे ताट, प्रत्येक घरासमोर पाण्याने सडासंमार्जन करुन रांगोळ्या रेखाटलेल्या होत्या. घड्याळातील काटा सात वर पोहोचतो न पोहोचतो, अनेक वर्षाच्या परंपरेला सुरुवात झाली. ती परंपरा म्हणजे लोटांगण घेण्याची. देवाप्रती भक्ताची निष्ठा दिसुन पडणारा हा क्षण हातात नारळ आणि जो मार्ग चालायसाठी बनला आहे, त्या मार्गावर तब्बल एक किलोमिटर चे लोटांगण घेत, 30 हून अधिक भक्तांनी बिच्छन नदीचे पात्र गाठले.

अचलपूर शहरातील जीवपूरा परिसरात असलेले बालाजी संस्थान मंदिर हे शहरातील प्राचीन मंदिरांपैकी एक मानले जाते. ऐतिहासिक नोंदीनुसार, या मंदिराची स्थापना 6 जून 1118 रोजी करण्यात आली होती. त्या काळात या परिसरात जैन पंथीयांचे वर्चस्व असल्याचे म्हटले जाते. बालाजी संस्थानतर्फे दरवर्षी बालाजी वार्षिक यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा कार्यक्रम सलग पाच दिवस चालतो. पहिल्या दिवशी सिंहपूजा, दुसऱ्या दिवशी घोड्याची पूजा, तिसऱ्या दिवशी हत्तीची पूजा, चौथ्या दिवशी प्रतिकात्मक सिंह, हत्ती, घोडा, गरुड व हनुमान या पंचवाहनांची पूजा तसेच ताटीका वधाचा कार्यक्रम पार पडतो. पाचव्या दिवशी पुन्हा पंचवाहन पूजा आणि सकाळी भाविकांचा लोटांगण सोहळा होतो.

### बाहेर गावाहून येतात भाविक

या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे भाविकांचा लोटांगण कार्यक्रम. भाविक बालाजी मंदिरापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावरील बिच्छन नदीपर्यंत लोटांगण घालत जातात. महाराष्ट्रात इतक्या लांब अंतराचा लोटांगण कार्यक्रम अन्यत्र कुठेच पाहायला मिळत नाही, असा विश्वास स्थानिकांचा आहे. त्यामुळे या दिवशी शेकडो भाविक बाहेर गावाहून जीवनपूरात दाखल होतात.

### भाविकांना विनामूल्य अल्पोउपहाराची व्यवस्था

लोटांगणानंतर जीवनपूरा वार्डातील नागरिक एकत्र येऊन भाविकांसाठी पाणी, चहा, नाश्ता यांची व्यवस्था करतात. भाविकांचे स्वागत घरच्या पाहुण्यांप्रमाणे केले जाते. संस्थान व स्थानिक नागरिकांच्या या प्रेमामुळे बाहेरगावच्या भक्तांमध्ये दरवर्षी मोठा उत्साह दिसतो.

### सध्याकांळी पालखी सोहळा

लोटांगण कार्यक्रमानंतर सायंकाळी भगवान बालाजी यांचा पालखी सोहळा आयोजित करण्यात येते. यावेळी येथे यात्रा भरविण्यात येते. कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी भव्य भंडारा आयोजित केला जातो, ज्यात हजारो भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात.

## 13 हजार रुपयांचे संत्रे चोरी

**पथ्रोट** – पार्डी शेत शिवारात चोरीची घटना घडली आहे. ही घटना रविवार सकाळी 5 वाजता घडली, तर फिर्यादीने सोमवारी, 6 ऑक्टोबर रोजी सकाळी 4 वाजता, पोलीस स्टेशन पथ्रोट येथे तक्रार दाखल केली. फिर्यादी हर्षल शेळके, रा. पथ्रोट, यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, त्यांच्या पार्डी शेत शिवारातील 5 एकर शेतात संत्रे व केळीची पिके लावलेली आहेत. त्यात नमूद आरोपी धनराज आठवले, रा. पार्डी यांनी त्यांच्या शेतातून अंदाजे 13 हजार रुपयांचे संत्रे तोडून चोरी करून नेले असल्याचे सांगितले आहे. पोलीस या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहेत.

# धान्य हिसकावलं, मानधन अडकलं!

**तालुक्यातील शेतकरी अडचणीत**

महासागर | प्रतिनिधी

**पथ्रोट, (दि. 8)** –पूर्वी शेतकऱ्यांसाठी लागू असलेल्या स्वस्त धान्य पुरवठा योजनेत बदल करून शासनाने धान्याऐवजी मानधन देण्याचा निर्णय घेतला. हा बदल करताना शेतकऱ्यांचा विचार केला गेला नाही, कारण धान्य हा त्यांच्या उपजीविकेचा मुख्य आधार होता.

बदलानंतर प्रतिव्यक्ती 170 रुपये दिल्याचे जाहीर झाले, मात्र आठ महिन्यांपासून एकही शेतकऱ्याच्या खात्यात पैसे जमा झालेले नाहीत. धान्यावर उपजीविका करणारे शेतकरी आता मोठ्या अडचणीत आले आहेत. अनेक शेतकऱ्यांच्या कुटुंबातील चिमुकले उपाशी झोपत आहेत, तरीही प्रशासनाकडे तक्रारींवर दुर्लक्ष होत आहे.

शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना थेट रोख अनुदान देण्याचा निर्णय 28 फेब्रुवारी 2023 रोजी सुरू करण्यात आला होता. सुरुवातीला दरमहा 150 रुपये मिळत होते, परंतु 20 जून 2024 रोजी ही रक्कम 170 रुपयांपर्यंत वाढवली गेली. योजना शेतकऱ्यांना दिलासा देईल, अशी अपेक्षा होती; मात्र शासन अनुदान देण्यात विलंब करत असल्यामुळे शेतकऱ्यांचा रोष वाढत आहे.



### कर्जबाजारीपणा आणि पिकांचा अनिश्चितता

शेतकरी आधीच कर्जबाजारीपणात, पिकांच्या अनिश्चिततेत आणि बाजारपेठेच्या दबावात संघर्ष करत आहेत. धान्य हिसकावले गेले आणि मानधनाचे खोटे आश्वासन दिल्यामुळे अनेक शेतकरी रस्त्यावर उतरू लागले आहेत. काही शेतकऱ्यांनी चेतावणी दिली आहे की, रस्त्यावर उतरल्यास होणाऱ्या परिणामाची जबाबदारी शासनावर असेल.

### चार हजाराहून अधिक लाभार्थी प्रतीक्षेत

अचलपूर तालुक्यात सुमारे चार हजार लाभार्थी शेतकरी कुटुंबे आजही मानधनाच्या प्रतीक्षेत आहेत. रोज तहसील कार्यालयाची चकरा मारत आहे., मानधन आज मिळेल की उद्या? अशी आशा धरून दिवस घालवत आहेत, परंतु शासनाच्या तिजोरीतून निधी उपलब्ध न झाल्यामुळे शेतकऱ्यांची समस्या अद्याप कायम आहे.


# ग्रामपंचायत कार्यालय–हिंगणगाव (का)

## ता. धामणगाव रेल्वे, जिल्हा. अमरावती

ग्रामपंचायत कार्यालय हिंगणगाव (का.) ता.धामणगाव रेल्वे, जि. अमरावती यांचे तर्फे खालील कामाची मोहरबंद निविदा ब 1 टक्केवारी प्रपत्रामध्ये दोन लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांचे वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा ग्राम पंचायत कार्यालय हिंगणगाव (का.) ता. धामणगाव रेल्वे, जिल्हा. अमरावती येथे उपलब्ध आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजित किमत (रूपये) | बयाना रक्कम | कामाची मुदत | निविदा प्रसिद्धीची वेळ | निविदा फी | कोऱ्या निविदा देण्याची तारीख व वेळ स्विीकृतीचा दिनांक | निविदा उघडण्याची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिंगणगाव येथील स्मशानभूमी ला जोडणारा सिमेंट कॉंक्रीट रस्ता | जनसुविधा | १०,००,००० | १०,०००/– | २ महिने | प्रथम | ५०० | ०९/१०/२०२५ ते १६/१०/२०२५ कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून | दिनांक १७/१०/२०२५ दुपारी ११.०० वाजता |

टिप– 1) निविदेच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालय हिंगणगाव, ता. धामणगाव रेल्वे, जिल्हा, अमरावती यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

2) निविदा या दोन लिफाफा पद्धतीने सादर करावयाच्या आहे.

3) शासन निर्णयानुसार सर्व कपाती करण्यात येईल.

4) निविदा स्वीकारण्याचे तसेच काही कारणास्तव निविदा रद्द करण्याचे अधिकार प्रशासक/सचिव यांनी राखून ठेवले आहे.

5) निविदा उघडण्याच्या दिनांकामध्ये व वेळेमध्ये बदल होऊ शकतो पण त्याबाबत ग्रामपंचायत नोटीस बोर्डावर प्रसिद्धी देण्यात येईल, याबाबतचे सर्व अधिकार ग्रा.पं. ने राखून ठेवले आहे.

**सरपंच/सचिव**
**ग्रामपंचायत कार्यालय**
**हिंगणगाव (का)**


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक –श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# गडचिरोली येथील महिंद्रा ट्रॅक्टर कौशल्य विकास केंद्राचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन



**गडचिरोली, ७ ऑक्टोबर :** महाराष्ट्रातील गडचिरोली येथील महिंद्रा ट्रॅक्टरच्या कौशल्य विकास केंद्राचे आज उद्घाटन झाले. भारताचे माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज मुंबईतून ऑनलाइन पद्धतीने हे उद्घाटन केले. ग्रामीण तरुणांना उद्योगाशी संबंधित कौशल्यांनी सुसज्ज करून सक्षम करणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. ज्यामुळे या भागात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील.

भारतातील नंबर१ ट्रॅक्टर ब्रँड असलेल्या महिंद्रा ट्रॅक्टरने भारताच्या ग्रामीण भागातील कौशल्य आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीने भागीदारी करत गडचिरोली येथील सरकारी आयटीआय कॉलेजमध्ये हे कौशल्य विकास केंद्र स्थापन केले. भारताची सर्वात मोठी शक्ती असलेल्या लोकसंख्येचा उपयोग करून घेण्यासाठी कौशल्य विकासावर भर देण्याचे सध्या देशाच्या नेतृत्वाचे धोरण आहे. त्याच अनुषंगाने हा उपक्रम राबवला जात आहे. गडचिरोलीतील तरुणांना उद्योगासाठी आवश्यक कौशल्ये शिकवण्यासोबतच स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यावरही लक्ष केंद्रित करते.

या प्रसंगी महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडच्या शेती उपकरण व्यवसायाचे अध्यक्ष विजय नाक्रा म्हणाले, माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गडचिरोली येथील महिंद्रा ट्रॅक्टर कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन केल्याचा आम्हाला खूप अभिमान आहे. महाराष्ट्र हे केवळ एक आघाडीचे औद्योगिक केंद्र नाही तर कृषी क्षेत्राच्या विकासाशी, त्याच्या प्रवासाशी खोलवर जोडलेले राज्य आहे. महाराष्ट्र सरकारसोबत भागीदारी करणे, कौशल्य जोपासण्यासोबतच त्याला योग्य संधी देणे आणि आशेला खतपाणी घालून ग्रामीण समुदायाला उन्नत करणारे भविष्य निर्माण करणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.

# एफसीआय कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना १०२० बेडच्या शालिनीताई मेघे हॉस्पिटलमध्ये कॅशलेस उपचार सुविधा मिळणार

**नागपूर, ७ ऑक्टोबर :** फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या (एफसीआय) सीजीएचएस लाभार्थ्यांसाठी उत्तम आरोग्यसेवा अधिक सुलभ करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, वानाडोंगरी, नागपूर येथील दत्ता मेघे मेडिकल कॉलेजशी संलग्न असलेले १०२० बेडचे शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर आता फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या पॅनलमध्ये समाविष्ट झाले आहे. या उपक्रमामुळे नागपूर विभागातील एफसीआयचे कर्मचारी, विभागीय कामगार, निवृत्त कर्मचारी, त्यांचे जोडीदार आणि आश्रित कुटुंबियांना कॅशलेस आरोग्यसेवेचा मोठा फायदा मिळणार आहे.

या संलग्नीकरणामुळे आता फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे लाभार्थी शालिनीताई मेघे हॉस्पिटलमध्ये विविध आरोग्यसेवा घेऊ शकतील. यात सर्वसाधारण उपचार, तज्ञ डॉक्टरांकडून होणारे विशेष उपचार, शस्त्रक्रिया आणि आपत्कालीन सेवा यांचा समावेश आहे. या उपक्रमामुळे हजारो लाभार्थी आणि त्यांच्या कुटुंबियांना दर्जेदार आणि सुलभ आरोग्यसेवा मिळण्यास मोठी मदत होईल.

या संलग्नीकरणाचे एक विशेष वैशिष्ट्य म्हणजे उपचाराच्या खर्चात मोठी बचत होणार आहे. एफसीआयच्या करारानुसार लाभार्थ्यांना कॅशलेस किंवा अनुदानित आरोग्यसेवा मिळणार आहेत, ज्यामुळे महागड्या उपचाराच्या खर्चाची चिंता न करता वेळेवर उपचार घेता येतील.

शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर हे एक मल्टी-सुपर-स्पेशालिटी हॉस्पिटल आहे. येथे ३० बेडचे आपत्कालीन विभाग आणि ६५ बेडचे इंटेन्सिव्ह केअर युनिट (आयसीयू) आहे. तसेच हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक सुविधांसह कॅथ लेब, एमआरआय, सीटी स्कॅन, अल्ट्रासोनोग्राफी आणि डिजिटल एक्स-रे सुविधा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलमध्ये हृदयविकारासाठी अँगिओग्राफी, अँगिओप्लास्टी, बायपास आणि व्हॉल्व्ह शस्त्रक्रिया यांसारख्या प्रगत उपचारांसह सर्वसाधारण आणि न्यूरो शस्त्रक्रिया, टोटल नी आणि हिप रिप्लेसमेंट, युरॉलॉजी, गॅस्ट्रोएंटरॉलॉजी, न्युरॉलॉजी, स्त्रीरोग व प्रसूती, बालरोग, ईएनटी, नेत्ररोग, ऑर्थोपेडिक्स, त्वचारोग आणि मानसोपचार सेवा देखील एकाच ठिकाणी उपलब्ध आहेत. या सर्व सुविधा अत्यंत अनुभवी वैद्यकीय आणि शस्त्रक्रियाविषयक तज्ज्ञांच्या टीमद्वारे समर्थित आहेत, जी संपूर्ण आणि दर्जेदार आरोग्यसेवा देण्यास कटिबद्ध आहे.

या प्रसंगी डॉ. अनुप मरार, डायरेक्टर डीएमआयएचईआर (ऑफ कॅम्पस, नागपूर) यांनी एफसीआयच्या अधिकाऱ्यांचे त्यांच्या विश्वासाबद्दल आभार व्यक्त केले. त्यांनी सांगितले, एफसीआयसोबत संलग्न होण्याचा आणि त्यांच्या लाभार्थ्यांना वैद्यकीय सेवा देण्याचा आम्हाला अत्यंत आनंद आहे. आमचे हॉस्पिटल सदैव उच्च दर्जाची आरोग्यसेवा देण्यास वचनबद्ध आहे. या भागीदारीमुळे आम्हाला समाजाला अधिक चांगली सेवा देण्यास तसेच कामगार व त्यांच्या कुटुंबांच्या आरोग्य व कल्याणाची हमी देण्यास मदत करेल.

डॉ. वसंत गावंडे, मुख्य वैद्यकीय अधीक्षक, एसएमएचआरसी यांनी सांगितले की एफसीआय लाभार्थ्यांना आणखी चांगली आरोग्यसेवा मिळावी म्हणून हॉस्पिटलमध्ये एफसीआय हेल्पडेस्क स्थापन करण्यात आली आहे. या हेल्पडेस्कद्वारे रुग्णांना कॅशलेस विभागातील माहिती आणि प्रक्रिया याबद्दल मार्गदर्शन मिळेल. ही जबाबदारी डॉ. सुधीर सिंग (एएमएस एसएमएचआरसी) आणि अहमिंद्र जैन (एओ) यांच्या नेतृत्वाखाली पार पाडली जाईल.

डॉ. सुधीर सिंह (एएमएस एसएमएचआरसी) यांनी सुनील सुरे (ऑपरेशन्स मॅनेजर) यांचे विशेष कौतुक केले, ज्यांनी चैतन्य मेघे यांच्या सहकार्याने संलग्नीकरणाची प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.



# विश्व हृदय दिनानिमित्त ए.व्ही.बी.आर.एच. मध्ये हार्ट फेल्युअर क्लिनिकचे उद्घाटन

**चंद्रपूर, ७ ऑक्टोबर :** आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुणालय (ए.व्ही.बी.आर.एच.) विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, शालिनीताई मेघे सुपर स्पेशालिटी सेंटर अंतर्गत कार्यरत, इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजी आणि कार्डिअॅक सर्जरी क्षेत्रात नवनवीन मापदंड निर्माण करत आहे. विश्व हृदय दिनानिमित्त रुणालयात हार्ट फेल्युअर क्लिनिकचे उद्घाटन करण्यात आले असून, ही क्लिनिक प्रत्येक गुरुवारी सकाळी ९:०० ते दुपारी १:०० या वेळेत कार्यरत राहील.

ए.व्ही.बी.आर.एच. रुणालय आरोग्यसेवेत ३० वर्षांहून अधिक अनुभवासह रुग्ण-केंद्रित सेवा, अत्याधुनिक कार्डिअॅक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्स, सुपर स्पेशालिटी सेवा आणि ट्रान्सप्लांट सुविधा प्रदान करते. अनुभवी कार्डिओलॉजिस्ट, कार्डिओथोरॅसिक आणि व्हॅस्क्युलर सर्जन यांच्या टीमद्वारे जागतिक दर्जाची हृदयसेवा दिली जाते.

मुख्य ठळक बाबी:

१५,०००+ अँजिओग्राफी अत्याधुनिक कॅथ लॅबमध्ये सीटी इमेजिंगसह
७,०००+ जटिल अँजिओप्लास्टी ९९% पेक्षा जास्त यशदरासह
१,०००+ बलून माइट्रल वॉल्व्युलोप्लास्टी (बीएमव्ही)
३,०००+ बाल हृदयविकार प्रकरणे विदर्भातील सर्वाधिक
पीडीए स्टेंटिंग १२ तासांच्या बाळावर यशस्वीरीत्या पार पडले
इलेक्ट्रोफिजिओलॉजी सुविधा रुग्णांच्या उत्तम निरीक्षणासाठी

रुग्णालयाने आतापर्यंत ३,००० हून अधिक रुग्णांवर प्रगत ओपन हार्ट आणि बायपास शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडल्या आहेत.

डॉ. गजेन्द्र अग्रवाल, प्रमुख कार्डिओलॉजी विभाग, म्हणाले, आमचे ध्येय म्हणजे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि करुणामय, रुग्ण-प्रथम दृष्टिकोन यांचा संगम घडवणे. प्रत्येक यशस्वी हस्तक्षेप आमच्या समर्पणाचे प्रतीक आहे लोकांचे जीवन वाचवणे आणि सुधारणा करणे हेच आमचे उद्दिष्ट आहे.

# लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीजला यूएस एफडीए नोंदणी, जागतिक हेल्थकेअर मॅन्युफॅक्चरिंगमध्ये भारताची स्थिती मजबूत



**मुंबई, ७ ऑक्टोबर :** लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेडला त्यांच्या सर्जिकल कंज्यूमेबल्स, ऑर्थोपेडिक सपोर्ट्स आणि हायजीन उत्पादनांच्या मालिकेसाठी यूएस एफडीए नोंदणी मिळाली आहे. ही उपलब्धी कंपनीच्या उत्कृष्ट उत्पादन क्षमतेचे प्रतीक आहे आणि जागतिक हेल्थकेअर सप्लाय चेनमध्ये भारताची स्थिती अधिक मजबूत करते.

यूएस एफडीए नोंदणी उत्पादन सुरक्षा, गुणवत्ता आणि अनुपालनाचे सर्वोच्च मानक दर्शवते. भारतीय उत्पादकांसाठी हे अमेरिके, युरोपियन युनियन आणि मध्य पूर्व यांसारख्या नियमनयुक्त आंतरराष्ट्रीय बाजारपेठांचे दारे उघडते, ज्यामुळे व्यवसाय वृद्धीच्या अपूर्व संधी निर्माण होतात. लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीजसाठी ही त्यांच्या जागतिक विस्ताराच्या प्रवासातील ऐतिहासिक क्षण आहे, जे निर्यात संधी वाढवते आणि हेल्थकेअर मॅन्युफॅक्चरिंगमध्ये भारताला जागतिक नेतृत्वाकडे घेऊन जाते.

एफडीए-मान्यताप्राप्त उत्पादन पोर्टफोलिओ हेल्थकेअर श्रेणींच्या विस्तृत रेंजला कव्हर करते ज्यात मेडिकल कंज्यूमेबल्स जसे कॉटन क्रीप बँडेज, इलास्टिक अॅडहेसिव बँडेज, कॅनुला फिक्सेटर्स आणि डिसइन्फेक्टंट वेट वाइप्स, तसेच पुनर्वसन आणि ऑर्थोपेडिक उत्पादने जसे ऍब्डॉमिनल आणि रिब बेल्ट्स, लम्बर सपोर्ट्स, सर्वायकल कॉलर्स, टेलर ब्रेस, आर्म स्लिंग्स, शोल्डर इम्मोबिलायझर्स, कॉकअप स्प्लिंट्स आणि नी इम्मोबिलायझर्स यांचा समावेश आहे.

लॉर्ड्स जॉय ब्रँड बेबी वाइप्स, बेड बाथ वाइप्स आणि रिफ्रेशिंग वाइप्ससह हा पोर्टफोलिओ पूर्ण करतो.

कंपनीच्या दृष्टिकोनाबद्दल बोलताना लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक सचिदानंद उपाध्याय म्हणाले, आमचा उद्देश आहे की भारतीय निर्मित हेल्थकेअर सोल्यूशन्स जागतिक दर्जाची गुणवत्ता देत, सर्वांसाठी सहज उपलब्ध व्हावीत. एफडीए नोंदणी आमच्या या वचनबद्धतेला अधिक बळकट करते आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये आमच्या उपस्थितीचा विस्तार करते.

कार्यकारी संचालक मानव तेली यांच्या नेतृत्वाखाली आणि व्यवसाय प्रमुख नीरज ओझा यांच्या सहकार्याने कंपनीने ऑटोमेशन, संशोधन-आधारित नवकल्पना आणि शाश्वत उत्पादनावर भर देत आपले ऑपरेशन विस्तारले आहे.

या उपलब्धीबद्दल बोलताना मानव तेली म्हणाले, यूएस एफडीए नोंदणी आमच्या टीमच्या गुणवत्ता आणि नवकल्पना प्रतिबद्धतेचे प्रमाण आहे. प्रगत ऑटोमेशन, कठोर क्यूसी आणि स्मार्ट लॉजिस्टिक्ससह, आम्ही एक वेगवान, पारदर्शक आणि तंत्रज्ञान-आधारित जागतिक हेल्थकेअर सप्लाय चेन तयार करत आहोत.

# कॅनरा एचएसबीसी लाईफ इन्शुरन्स कंपनीची प्राथमिक समभाग विक्री १० ऑक्टोबरपासून होणार सुरू




**मुंबई, ७ ऑक्टोबर :** कॅनरा एचएसबीसी लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडची (कंपनी) प्रती शेअर १० रु. दर्शनी मूल्य असलेल्या इक्विटी शेअरसाठीची प्राथमिक समभाग विक्री (इक्विटी शेअर्स) शुक्रवार १० ऑक्टोबर २०२५ रोजी खुली करण्याचा प्रस्ताव आहे.

कंपनीच्या प्राथमिक समभाग विक्री ऑफरमध्ये प्रवर्तक विक्री समभागधारकांकडून २३७,५००,००० पर्यंतच्या इक्विटी शेअर्सची ऑफर फॉर सेल आहे. प्रति इक्विटी शेअरसाठी १०० रु. ते १०६ रु. किंमतपट्टा निश्चित करण्यात आला आहे. बोली किमान १४० इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १४० इक्विटी शेअर्सच्या पटीत लावता येईल

ऑफर फॉर सेल मध्ये १३७,७५०,००० पर्यंतचे इक्विटी शेअर्स कॅनरा बँकेकडून, एचएसबीसी इन्श्युरन्स (एशिया- पॅसिफिक) होल्डिंग्ज लिमिटेड कडून ४,७५०,००० पर्यंतचे इक्विटी शेअर्स आणि पंजाब नॅशनल बँकेकडून ९५,०००,००० पर्यंतचे इक्विटी शेअर्स आहेत.

प्रमुख गुंतवणूकदाराच्या बोलीचा दिनांक गुरूवार, ०९ ऑक्टोबर २०२५ आहे. बोली/ऑफर शुक्रवार १० ऑक्टोबर २०२५ रोजी खुली होईल आणि मंगळवार, १४ ऑक्टोबर २०२५ रोजी बंद होईल.

हे इक्विटी शेअर्स कंपनीच्या दिनांक ०४ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस द्वारे सादर करण्यात येत असून नवी दिल्ली येथील रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, दिल्ली आणि हरयाणा यांच्याकडे दाखल करण्यात आले आहेत.

रेड हेअरिंग प्रोस्पेक्टस द्वारे कंपनीचे इक्विटी शेअर्स बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड वर सूचीबद्ध करण्याचे प्रस्तावित आहे.

एसबीआय कॅपिटल मार्केट्स लिमिटेड, बीएनपी परिबास, एचएसबीसी सिक्युरिटीज अँड कॅपिटल मार्केट्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, जेएम फायनान्शीयल लिमिटेड आणि मोतीलाल ओसवाल इन्व्हेस्टमेंट डव्हायर्स लिमिटेड हे या ऑफरचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स आहेत.

# 'गणेश कार्तिकेय' मालिकेत कार्तिकेयशी असलेले तणावपूर्ण नाते सुधारण्यासाठी देवी पार्वतीचे प्रयत्न

**मुंबई, ७ ऑक्टोबर :** सोनी सबवरील गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय ही नुकतीच सुरू झालेली पौराणिक मालिका प्रेक्षकांना भक्तिरसात भिजवण्यासाठी सज्ज आहे. या भव्य दिव्य मालिकेत शंकर (मोहित मलिक), देवी पार्वती (श्रेनु परीख) तसेच त्यांची मुले गणेश (एकांश कथुरिया) व कार्तिकेय (सुभान खान) यांच्या फारशा न ऐकलेल्या कथा सादर होणार आहेत. मानवी भावनांनी भरलेली ही पौराणिक मालिका कथानकाच्या खोलात जाऊन दैवी कुटुंबातील कौटुंबिक नाती, संघर्ष आणि यशापयश यांचाही शोध घेते.

सुरुवातीच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी सतीचा पार्वतीच्या रूपात पुनर्जन्म झाल्याचे पाहिले. तसेच तारकासुर देखील प्रबळ झाल्याचे पाहिले आणि त्याला हे कळले आहे की फक्त कार्तिकेयच त्याचा निःपात करू शकतो. शिव आणि पार्वतीच्या मिलनातून कार्तिकेयाचा जन्म होतो. पण, तो इतका ऊर्जावान आहे की, त्याची दिव्य शक्ती सहा कृतिकांमध्ये विभाजित होते. ज्या त्याचा सांभाळ करतात आणि बारा वर्षांनंतर त्याला त्याच्या खऱ्या आईकडे सोपवतात. दरम्यान, तारकासुराकडून आपले सिंहासन परत मिळवण्यासाठी उतावळा झालेला इंद्र (करण सूचक) कार्तिकेयचे लक्ष केवळ त्याच्या संहाराच्या ध्येयावरच राहावे यासाठी प्रयत्न करण्याच्या नादात कार्तिकेय आणि पार्वती यांच्यात फूट पाडतो. तो कार्तिकेयच्या मनात हे भरवतो की, तो केवळ नियतीचे एक शस्त्र आहे आणि पार्वती त्याला आपला पुत्र मानत नाही. आपले कर्तव्य आणि मातृत्व यांच्यात सापडलेली पार्वती कार्तिकेयाला आपल्या घरी कैलासवर आणण्यासाठी आसूसली आहे. पण कार्तिकेय येतो, तो मनात आईविषयीची अढी घेऊनच. इंद्र हा दुरावा वाढवण्यासाठी सतत प्रयत्न करत राहतो. व्यथित झालेली पार्वती स्वतःचा मुलगा दंडपाणी (आयुध भानुशाली) निर्माण करते.

# फोनपे पेमेंट गेटवेने मास्टरकार्डसोबत भागीदारी करत संपूर्ण इकोसिस्टमसाठी डिव्हाइस टोकनायझेशन केले लाँच ; इक्सीगो सोबत सुरुवात



**नागपूर, ७ ऑक्टोबर :** एकदा सेव्ह करा, सगळीकडे वापरा या नव्या फीचरमुळे ग्राहकांना फोनपे अॅपवर आपले कार्ड सुरक्षितरीत्या सेव्ह करता येते आणि नेटवर्कमधील सर्व मर्चंट्सकडे एक टॅप करून पेमेंट करता येते.

फोनपे पेमेंट गेटवेने आज मास्टरकार्ड या जागतिक पेमेंट्स तंत्रज्ञान कंपनीसोबत धोरणात्मक भागीदारी करत डिव्हाइस टोकनायझेशन सोल्यूशन लाँच करण्याची घोषणा केली. ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये २०२५ जाहीर केलेल्या या उपक्रमाद्वारे मास्टरकार्डची नेटवर्क-टोकनायझेशन क्षमता फोनपे पेमेंट गेटवेच्या व्यापारी प्लॅटफॉर्मवर उपलब्ध झाली आहे. यामुळे ऑनलाइन व्यवसायांसाठी सुरक्षित पेमेंट पर्याय विस्तारले आहेत. लाखो ग्राहकांच्या चेकआऊटच्या अनुभवात आमूलाग्र बदल घडवणारा हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. इक्सीगो हा भारतातील आघाडीचे एआय-आधारित ट्रॅव्हल प्लॅटफॉर्म असून फोनपेवर विमान, बस आणि ट्रेन बुकिंगची सुविधा देणारा विशेष भागीदार आहे. इक्सीगो ने फोनपे पेमेंट गेटवेचे इंटिग्रेशन करून आपल्या अॅपवर लाखो युजरना अधिक वेगवान आणि सुरक्षित कार्ड पेमेंटची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

या लाँचनंतर ग्राहकांना आता फोनपे अॅपवर एकदाच आपले कार्ड सेव्ह करता येईल आणि सर्व सहभागी ऑनलाइन व्यापाऱ्यांकडे सुरक्षितरीत्या वापरता येईल. या एकदा सेव्ह करा, सगळीकडे वापरा अनुभवामुळे ग्राहकांना नवीन वेबसाइट्स किंवा अॅपवर व्यवहार करताना वारंवार कार्ड तपशील भरावा लागणार नाही. त्यामुळे अखंड आणि परस्पर जोडलेला असा व्यवहाराचा अनुभव मिळतो.

या सोल्यूशनमुळे सुरक्षित टोकनाइज्ड व्यवहारातील मास्टरकार्डची जागतिक तज्ज्ञता आणि फोनपेची प्रचंड व्याप्ती व व्यापारी नेटवर्क यांची सांगड घालण्यात आली आहे. यामुळे ग्राहक आणि व्यवसाय दोघांनाही फायदेशीर ठरणारा वन-टॅप चेकआऊट अनुभव तयार झाला आहे. व्यापाऱ्यांना कमी ड्रॉप-ऑफ्स आणि ग्राहकांसाठी सुरळीत

# पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत एक भावनिक वळण ; दीप्ती आणि अश्विनमधील वैवाहिक संबंधात तणाव वाढला

**मुंबई, ७ ऑक्टोबर :** हृदयस्पर्शी व्यक्तिरेखा आणि प्रेरणादायक कथानक यामुळे सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल सगळ्यांची लाडकी बनली आहे. पुष्पा (करुणा पांडे) वकील बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सध्या प्रयत्नशील आहे, पण आत्ताची तिच्यासमोर नवीन अडथळे आहेत, ज्यामध्ये तिच्या दृढतेची आणि तिच्या जवळच्या नात्यांची कसोटी होत आहे. अलीकडच्या भागांमध्ये, सोनल (भक्ती राठोड) पुष्पा आणि अश्विन (समृद्ध बावा) त्याच्या अंजना (आर्शी) नामक मैत्रिणीविषयीचे सत्य लपवत असल्याचे उघड करून दीप्तीला (गरिमा परिहार) त्यांचे घर सोडून आपल्याबरोबर येण्यास सांगते.

आगामी भागांमध्ये, प्रेक्षक बघतील की, दीप्ती घर सोडून जाईल आणि याचा ठपका अश्विन आणि पुष्पावर येईल. अश्विनसाठी कठीण काळ असला, तरी दीप्ती करवा चौथसाठी घरी परतते. असे केल्याने सारे काही ठीक होईल अशी तिची अपेक्षा असते, पण




अंजनाला तातडीने वैद्यकीय उपचारांची गरज असल्याचे कळल्यावर अश्विन तिच्याकडे धाव घेतो. नेमकी दीप्ती त्याला अंजनाला आय लव्ह यू म्हणताना ऐकते. आणि सहाजिकपणे परिस्थितीचा चुकीचा अर्थ लावते.

आपल्या घरातील हा वाढता तणाव पुष्पा कशाप्रकारे हाताळेल?

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, हे कथानक भावनिक घडामोडींनी भरलेले आहे, ज्यात एक आई म्हणून पुष्पाच्या दृढतेची कसोटी होणार आहे. दीप्ती आणि अश्विन या दोघांच्यामध्ये ती सापडली आहे. ते दोघेही दुःख आणि गैरसमजाचे परिणाम सोसत आहेत. एक आई म्हणून आपल्या कुटुंबाचे रक्षण करण्याचे आणि त्यांना एकत्र ठेवण्याचे मोठे आव्हान पुष्पापुढे आहे. हे क्षण पडद्यावर साकारणे हा भावनिक अनुभव आहे, कारण त्यात खऱ्याखुऱ्या कौटुंबिक संघर्षाचे प्रतिबिंब आहे, ज्यात सतत प्रेम, विश्वास आणि धैर्याची कसोटी होत असते. मला आशा आहे की, प्रेक्षकांना पुष्पाचा हा प्रवास आपलासा वाटेल आणि तिच्या भावना ते अनुभवू शकतील.

# शब्दकोडे क्रमांक २२३५



**आडवे शब्द :-**

१) केंद्रीय मंत्रीमंडळातील प्रमुख पद
६) डास, चिलट
१०) मगज
११) लाकूड कापण्याचे हत्यार
१३) संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
१६) घोड्याचे घर
१८) भावना, विचार यांचे इंद्रिय
१९) च्या सह
२०) किंमत
२१) लवकर, त्वरेने (हिं)
२२) वालुकामय जमीन
२४) मोठी नदी
२६) वाळा
२७) सामन्यात पराक्रम गाजविणारा
२८) सडसडीत
२९) अत्यंत गरजेच्या, अडचणीच्या वेळेला
३२) एक रंगीत कंदमूळ
३४) कशा प्रकारचा
३६) पर्वणी, पुण्यकाळ
३७) चणचण, उणीव
३९) इमारती च्या पायात भरण्याचा दगड
४०) समशीतोष्ण
४२) कार्य
४३) जिवलग मित्र
४५) मनाला लागलेली टोचणी
४६) खटला
४७) हवेचे आवरण
४९) लांबलचक, कंटाळा आणणारे भाषण
५०) चंद्र
५२) अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था
५३) भित्रा
५४) वृद्धी
५५) शिक्षा, दंड करण्याजोगे
५७) अजगर
५८) याग, यज्ञ
५९) स्वतःची फुशारकी
६०) न घाबरणारा
६१) मळलेला
६४) द्रव्य
६५) चेहेऱ्यावरील तेज
६७) मनसोक्त
७०) नंतर
७१) रमावर
७२) कान
७३) दात
७४) ज्वारी/बाजरी / नाचणीचा एक पदार्थ

**उभे शब्द :-**

१) जेवणाऱ्यांची बसलेली रांग
२) निष्णांत
३) जरब, भीती
४) मऊ
५) हिंदीत पत्र
६) मळलेला
७) बशीचा जोडीदार
८) घोडा
९) अग्नी
१२) अरण्यवास
१४) टरफल
१५) श्रीकृष्णाचे एक नाव
१७) संगोपन पालनपोषण
१९) सोबती
२३) कमळाचे तळे
२४) नूतन
२५) गाईचे पिल्लू
२६) छोटा खड्डा
२७) लुगडे, पातळ
२९) निःसत्व, वाईट
३०) व्यापारी फायदा
३१) एकाद्या विषयावर लोकांचे मत घेणे
३३) वजनदार
३५) चाणक्यनीती
३६) पंख
३७) आत पाणी असलेले माडाचे फळ
३८) दिवस
४०) ** दमयंती
४१) रानरेडा
४२) लबाडीचा हेतू
४४) खाणीत काम करणारा
४५) षष्टीची देवता
४८) व्रत
५१) मालक
५६) यमपुरी नरक
५७) विधनसभेतील लोकप्रतिनिधी
६२) कालू, शिंपला
६३) श्वेत कमळ
६४) हिंमत, धैर्य
६६) हिमालयातील एक केसाळ प्राणी
६८) पुरुष
६९) अरण्य

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | ब | ब | | को | म | ल | | अ | ट | क | | सु | ल | भ |
| | ट | क | | | न | | दा | द | | मा | ल | | ता | क |
| कों | ब | | अ | न | न | स | | पा | व | न | | सा | | भ |
| | टी | च | | थ | | र | मा | व | र | | ना | ग | रि | क |
| न | त | | वा | | पा | क | ळी | | व | न | च | र | | |
| र | | आ | | घ | रा | णे | | खा | र | ट | | गो | पा | ळ |
| वा | ता | व | र | ण | | | वा | स | | रा | | टी | | |
| ह | र | क | त | | फा | य | दा | | सा | ज | रा | | पा | प |
| न | | जा | | को | | दा | वा | | र | | न | र | व | र |
| | न | व | ल | को | ल | | दी | न | वा | णा | | ज | | त |
| क | ट | क | ट | | घ | व | | र | सा | | | क | ल | प |
| ट | | | का | र्ति | क | | अ | म | र | | का | | क्ष | र |
| | वा | स | व | | | हे | वा | | व | न | वा | स | | त |
| भा | | जा | णे | ये | णे | | ज | न्म | | ज | | ल | वा | |
| क | ल | | | न | | क | वी | | ग | र | म | | र | म |

# जेव्हा 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी'च्या सेटवर रोहिताश्व गौड यांना 'तिवारी जी' म्हणून हाक मारण्यात आली!



**मुंबई, ७ ऑक्टोबर :** भारतीय टेलिव्हिजनवरील सर्वात प्रतिभावान व लोकप्रिय कलाकारांपैकी एक रोहिताश्व गौड यांनी विविध मालिका आणि चित्रपटांमधील त्यांच्या बहुआयामी अभिनयासह प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. असे असताना, त्यांची सर्वात लोकप्रिय व आयकॉनिक भूमिका आहे एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय विनोदी मालिका 'भाबीजी घर पर है'मधील मनमोहन तिवारी. ही भूमिका त्यांच्या ओळखीचा निर्धारक भाग बनली आहे, जेथे ते भूमिकेमध्ये नसताना देखील सर्वत्र चाहते त्यांना प्रेमाने 'तिवारी जी' म्हणून हाक मारतात.

नुकतेच त्यांचा नवीन चित्रपट 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी'साठी ते शूटिंग करत असताना त्यांच्या टेलिव्हिजनवरील व्यक्तिमत्त्वाची लोकप्रियता पुन्हा दिसून आली. या चित्रपटामध्ये त्यांनी वरूण धवनच्या वडिलांची भूमिका साकारली आहे. सेटवरील अनुभवाबाबत सांगताना रोहिताश्व गौड ऊर्फ मनमोहन तिवारी आनंदाने म्हणाले, ''मालिका 'भाबीजी घर पर है'साठी प्रेक्षकांचे प्रेम पाहून नेहमी अद्भुत वाटते. चित्रपटाच्या सेटवर देखील सर्वांनी मला प्रेमाने 'तिवारी जी' म्हणून हाक मारली, ज्यामध्ये टीमपासून कलाकारांचा समावेश होता. मालिका व या भूमिकेने दीर्घकालीन छाप निर्माण केल्याचे पाहून आनंद होत आहे. वरूण देखील मला 'तिवारी जी' म्हणून हाक मारत होता, जे खूप धमाल वाटत होते. तो म्हणाला की त्याचे वडिल दिग्गज चित्रपटनिर्माते डेव्हिड धवन देखील मालिका 'भाबीजी घर पर है' पाहण्याचा आनंद घेतात आणि विनोद व परफॉर्मन्सचे कौतुक करतात. हे ऐकल्यानंतर मला मालिकेचा आणि मालिका घडवण्यामागील अद्भुत टीमचा खूप अभिमान वाटला.''



# आज का अंदाज

गुरूवार ९ ऑक्टोबर २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४ | ५ | ७ | २ | ४ | ७ | ८ |
| ५८० | २२० | २३० | ४६७ | ५७० | १५८ | १७९ | २६० |
| ४९० | ६९९ | १६८ | ८९० | ४८० | ३४७ | ३५९ | ३५० |
| ३०० | ७८९ | ३४८ | ११५ | ३९० | २५७ | ८९० | ४४० |
| ३१ | ४१ | ५२ | ७२ | २० | ४० | ७५ | ८५ |
| ३९ | ४९ | ५६ | ७६ | २१ | ४१ | ७६ | ८६ |
| ३० | ४० | ५८ | ७८ | २३ | ४३ | ७९ | ८९ |

**९ ऑक्टोबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २० | ५० | ८१ | ९१ |
| २६ | ५६ | ८४ | ९४ |
| २७ | ५७ | ८३ | ९३ |
| ४८० | १२२ | १३४ | १८० |
| २२८ | ३३९ | ३५० | ३७९ |
| ३९० | ४४७ | ५६७ | ५६८ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

० ६ ९ ८ ७

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर असेल. नवीन प्रकल्प सुरू करून, तुम्हाला भविष्यात लक्षणीय आर्थिक फायदा होईल. आज, तुम्ही ज्या यशासाठी खूप मेहनत घेतली आहे ते तुम्हाला मिळेल.

**वृषभ :** आज शिक्षण, सर्जनशीलता आणि लवचिकता बहरतील. बदलासाठी तयार राहा आणि लवचिक मानसिकता राखा. व्यावसायिकदृष्ट्या अद्वितीय कल्पना ओळखल्या जातील.

**मिथुन :** आर्थिक बाबी किंवा करिअरमध्ये धाडकन, विचार न करता निर्णय घेणे टाळा. तुमच्या वैयक्तिक आयुष्याकडे लक्ष द्या. जास्त ऐका आणि प्रतिक्रिया कमी द्या. आत्मनिरीक्षण करण्यावर भर द्या.

**कर्क :** टीमवर्क आणि सामाजिक संबंध आज नवीन संधी आणतील. आर्थिक बाबतीत वास्तववादी अपेक्षा ठेवा. नातेसंबंधांमध्ये संवेदनशीलता आवश्यक आहे, प्रियजन तुमचे लक्ष वेधतील.

**सिंह :** आज तुम्ही व्यवसायात थोडे व्यस्त असाल आणि तुमच्या कुटुंबासोबत वेळ घालवणे तुमच्यासाठी कठीण होईल. कला, अभिनयाच्या क्षेत्रात असलेल्या लोकांना आज सुवर्णसंधी मिळण्याचे योग आहेत.

**कन्या :** आज तुमच्या मेहनतीचे फळ मिळेल आणि तुमचे मन आनंदाने भरून जाईल. तुमचे वैवाहिक जीवन आनंदाने भरलेले असेल आणि पाहुण्यांचे आगमन हा आनंद द्विगुणित करेल.

**तुळ :** नवीन प्रयत्नांमध्ये घाई करू नका. संयम आणि पाठिंबा यामुळे नातेसंबंध मजबूत होतील. दीर्घकालीन नियोजन चांगले परिणाम देईल. अनोळखी लोकांशी भांडणे टाळा. नातेसंबंधांमध्य काळजी घ्या.

**वृश्चिक :** आज, तुमच्या मोठ्या भावाच्या मदतीने, तुम्ही तुमचे काम पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल. तुमचे हरवलेले काहीतरी सापडल्याने तुम्हाला खूप आनंद होईल. मात्र, प्रकृतीकडे लक्ष पुरवा.

**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असणार आहे. तुम्ही असे काही कराल की तुमचे शेजारीही तुमची प्रशंसा करतील. नवीन वाहन खरेदी करण्यास आजचा दिवस चांगला आहे.

**मकर :** आज तुम्ही वैयक्तिक आणि व्यावसायिक क्षेत्रातही चमक दाखवाल. इतरांवर जास्त नियंत्रण ठेवण्याचे टाळा. कायदेशीर प्रकरण न्यायालयात प्रलंबित असेल तर आज तुम्हाला न्याय मिळेल.

**कुंभ :** आज तुमची ऊर्जा सकारात्मक दिशेने वळवा. कामाच्या ठिकाणी किंवा नातेसंबंधांमध्ये संघर्ष टाळा. वैयक्तिक विकासावर लक्ष केंद्रित करा. हा दिवस चिंतन आणि दीर्घकालीन नियोजनासाठी परिपूर्ण आहे.

**मीन :** आजचा दिवस तुमच्यासाठी आनंदाचा असेल. तुमच्या वैयक्तिक आयुष्यातील कोणत्याही चालू समस्या तुम्ही सोडवाल आणि तुमचे मन समाधानी असेल. आज वडिलांचा सल्ला घ्या.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या!

## शिवसेना ( उबाठा ) ची मागणी ▌ खा.अरविंद सावंत यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.8 )** - राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफी व नैसर्गिक आपत्तीमुळे न्याय मिळावा, अशी मागणी करीत शिवसेना उबाठा गटाच्या वतीने बुधवार 8 ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. खासदार अरविंद सावंत यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या मोर्चात जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी सरकारने शेतकऱ्यांना सरसकट कर्ज मुक्तीचे आश्वासन दिले होते. पण एक वर्ष उलटूनही याविषयावर कोणताही निर्णय सरकारने घेतलेला नाही. त्यामुळे राज्यातील शेतकरी सततच्या नैसर्गीक आपत्ती, दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, उत्पादन खर्चातील वाढ, महागडी खते, औषधे यामुळे आर्थिक संकटात सापडले आहेत. पीकांचे भाव हमी भावापेक्षा कमी मिळत असून उत्पादन खर्च वसूल करणे देखील कठीण झाले आहे. शेतकरी व ग्रामीण भागाचे उपजीविकेचे प्रमुख साधन असलेल्या शेतीतील उत्पन्नाला हमीभाव, योग्य बाजार नसल्याने बहुतांश शेतकरी बँक व सावकाराकडील कर्जाच्या ओझ्याखाली दबले गेले आहेत. अनेकांना थकबाकीमुळे नोटीसा, जप्ती कार्यवाही केल्या जात आहे. त्यामुळे काहीकडून तर आत्महत्येचे टोकाचे निर्णय घेतले जात आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी शिवसेना उबाठा गटाच्या वतीने मोर्चा काढण्यात आला असल्याचे यावेळी सांगण्यात आले. खासदार अरविंद सावंत, जिल्हाप्रमुख पराग गुडधे, आमदार गजानन लवटे, जिल्हाप्रमुख मनोज कडू, नरेंद्र पडोळे, आसावरी देशमुख, प्रतिभा बोपशेट्टी, मनीषा टेंभरे, ज्योती अवघड, सृष्टी वाघमारे, उपजिल्हाप्रमुख राजेश बंड, प्रफुल भोजने, ओमकार ठाकरे, महेंद्र दिपटे, तालुकाप्रमुख प्रमोद धनोकार, कपिल देशमुख, नितीन हटवार, रामदास बैलमारे, दिलीप केणे, प्रमोद कोहाडे, शहर प्रमुख प्रवीण हरमकर, राजू आकोटकर, विजय ठाकरे, बाळा सावरकर, नरेंद्र शेळके, कुचीन कैतवास तसेच इतर शिवसैनिक यावेळी उपस्थित होते.

### या मागण्यांचा समावेश

या मोर्चात अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसानीसाठी शेतकर्यांना हेक्टरी रुपये 50 हजार इतकी थेट आर्थिक मदत त्वरित जाहीर करावी, नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सर्व कर्जातून कर्जमुक्त करावे, पीक विम्याचे कठीण निकष तातडीने शिथिल करून पंचनाम्याची प्रक्रिया बाजूला ठेवत विम्याची रक्कम त्वरित शेतकर्यांच्या खात्यात जमा करावी. अतिवृष्टीमुळे घरे व पशुधनाचे नुकसान झालेल्या नागरिकांना, जुने निकष न लावता, योग्य आणि पुरेसा मोबदला त्वरित देण्यात यावा, महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करावा, सरसकट कर्जमाफी करावी, एका हेक्टरला 50 हजार रुपये संत्रा पिकाला मदत द्यावी, एक रुपयाचा विमा शासनाने काढावा, खरीप पिकाकरिता पंचवीस हजार रुपये हेक्टरी मदत द्यावी, एन पी.ए. झालेल्या शेतकऱ्यांना पुन्हा शेती कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

# बेनोडा शहीद बसस्थानकावर घाणीचे साम्राज्य!

## नागरिकांचा संताप, राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे दुर्लक्षाचा आरोप



**महासागर | प्रतिनिधी**

**वरुड, ( दि. 8 )**- वरुड तालुक्यातील बेनोडा शहीद बसस्थानक परिसरात आज घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून, नाल्या बुजल्यामुळे साचलेल्या पाण्याने संपूर्ण परिसर दुर्गंधीयुक्त झाला आहे. प्रवासी, दुकानदार आणि नागरिक या सर्वांनाच दररोज या अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे.

स्थानिक नागरिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बसस्थानकाभोवती असलेल्या नाल्यांची साफसफाई अनेक दिवसांपासून झालेली नाही. पावसाळ्यानंतर साचलेली चिखलमाती, प्लास्टिक, कचरा आणि सांडपाण्यामुळे नाले पूर्णपणे बुजले आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी रस्त्यावर साचून वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे.

प्रवाशांचे म्हणणे आहे की, राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून या समस्येकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे. बसस्थानक हे दररोज हजारो प्रवाशांची वर्दळ असलेले ठिकाण असूनही येथील स्वच्छतेबाबत प्रशासन उदासीन आहे. स्थानिक ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून केवळ आश्वासनच मिळत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. जनतेचे कराचे पैसे खर्च होऊनही सार्वजनिक ठिकाणे अशीच अस्वच्छ राहिली, तर जबाबदार कोण? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत. नागरिकांची मागणी आहे की, राष्ट्रीय महामार्ग विभाग तसेच ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने नाल्यांची स्वच्छता करून परिसर निर्जंतुक करावा, अन्यथा नागरिकांना रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशारा देण्यात आला आहे.

# जरुड हायस्कूलमध्ये भव्य रंगभरण, चित्रकला स्पर्धा

## विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**महासागर | प्रतिनिधी**

**वरूड, ( दि.8 )** - तालुक्यातंर्गत येत असलेल्या जरुड हायस्कूल, जरुड येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान स्व. लालबहादूर शास्त्री यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त भव्य प्रमाणात रंगभरण व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

ही स्पर्धा श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचालित जरुड हायस्कूल व पी. जी. राऊत कनिष्ठ महाविद्यालय, जरुड यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडली. स्पर्धेत जरुड हायस्कूल, स्व. बाळासाहेब देशमुख विद्यालय, जि. प. शाळा मुले व मुली, वसंतराव नाईक विद्यालय, विवेकानंद इंग्लिश प्रायमरी स्कूल आदी शाळांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. लहानग्यांपासून ते उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनी कलाविश्वात आपल्या कल्पनांना रंग देत सुंदर चित्रांची निर्मिती केली. कार्यक्रमात माजी गट शिक्षणाधिकारी तथा शाळा निरीक्षक निळकंठराव यावले, वरुड तालुका स.नि.क.स. पतसंस्थेचे पदाधिकारी, उद्योजक सोपान ढोले, उद्योजक रोषण दारोकर, माजी प्राचार्य अशोक दुगाणे, से.नि. शिक्षक सुनिल महाकोडे, से.नि. शिक्षिका रंजना मानकर आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विजेत्यांना रोख पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. स्पर्धेचे यशस्वी आयोजन मुख्याध्यापक ओमप्रकाश दुपारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या उपक्रमाच्या संयोजिका कला शिक्षिका वंदना देशमुख, वनिता टिकस, सुनिल सोळंके, सारिका लांडगे, देवेंद्र खेरडे, स्नेहल मावंदे, मदन वानखेडे, रोहण पांडे होते. तर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी देवेंद्र पोहणे, निलेश गायकवाड, सुशिल झाडे, ऋषीकेश उमाळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन शिक्षक वैभव मोहोड यांनी केले. या भव्य स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला असून त्यांच्यातील कलाविष्काराला योग्य व्यासपीठ उपलब्ध झाले.

# संपकाळात सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरण सज्ज

## 7 वीज कर्मचारी संघटनांचा संप बेकायदेशीर; 'मेस्मा' लागू



**महासागर | प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 9 )**- महावितरणमधील सात वीज कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीने 9 ते 11 ऑक्टोबरदरम्यान संप पुकारला असून, या कालावधीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणने संपूर्ण तयारी केली आहे. राज्यभरातील सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या असून, सर्व कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द करून तात्काळ कामावर रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

व्यवस्थापनाने वारंवार सकारात्मक चर्चा करूनही संघटनांनी संपाचा निर्णय कायम ठेवला आहे. वीज ही अत्यावश्यक सेवा असल्याने महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम (मेस्मा) लागू करण्यात आला असून, हा संप बेकायदेशीर ठरला आहे. महावितरणने स्पष्ट केले आहे की, कंपनीतील 329 उपकेंद्रांचे खासगीकरण झालेले नाही. या उपकेंद्रांवर केवळ बाह्यस्त्रोत मनुष्यबळ पुरविण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. तसेच ग्राहकसेवा सुधारण्यासाठी राज्यात 2 विभाग, 37 उपविभाग आणि 30 शाखा कार्यालयांची निर्मिती करण्यात आली असून, कोणतीही पदकपात करण्यात आलेली नाही. संपाच्या काळात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी मनुष्यबळ नेमण्यात आले आहे.

वीजपुरवठा खंडित झाल्यास तत्काळ पर्यायी मार्गाने (बॅकफीड) सेवा सुरू केली जाईल. रुग्णालये, पाणीपुरवठा योजना, मोबाईल टॉवर्स व शासकीय कार्यालये या अत्यावश्यक सेवा प्राधान्याने सुरू ठेवण्याची खबरदारी घेण्यात आली आहे. ग्राहकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये व तक्रारींसाठी टोल फ्री क्रमांक 1912, 1800-212-3435 किंवा 1800-233-3435 वर संपर्क साधावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# माहिती अधिकार सप्ताहात विविध उपक्रम

## राज्य माहिती आयुक्त रवींद्र ठाकरे यांचे निर्देश

**महासागर | प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 8 )**- माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रभावीपणे राबवून प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी 6 ते 12 ऑक्टोबरदरम्यान अमरावती विभागात 'माहिती अधिकार सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावतीचे राज्य माहिती आयुक्त रवींद्र ठाकरे यांनी या संदर्भात सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये आणि सार्वजनिक प्राधिकरणांना सप्ताहाचे प्रभावी आयोजन करण्याचे निर्देश दिले आहेत.

सप्ताहादरम्यान शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये पथनाट्ये, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा, कार्यशाळा व चर्चासत्रे आयोजित केली आहेत. तसेच माहिती अधिकाराचा वापर करून सकारात्मक बदल घडवणाऱ्या नागरिक आणि अधिकाऱ्यांच्या यशोगाथाही सादर केल्या. या उपक्रमांना स्वयंसेवी संस्था, रोटरी व लॉयन्स क्लब आदींचे सहकार्य घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने आपल्या संकेतस्थळावर आणि सूचना फलकावर कलम 4 (1)(ख) नुसार 17 मुद्यांची अद्ययावत माहिती प्रसिद्ध करावी, तसेच प्रलंबित अर्ज व अपिले वेळेत निकाली काढावीत, अशा सूचनाही आयोगाने दिल्या आहेत.



> माहितीचा अधिकार हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार असून प्रशासन पारदर्शक ठेवण्याचे प्रभावी साधन आहे. प्रत्येक नागरिकाने या अधिकाराचा योग्य वापर करून शासनाच्या कार्यात सहभाग वाढवावा.
>
> **रवींद्र ठाकरे, राज्य माहिती आयुक्त.**

## मृतदेह आढळला

**अमरावती** - राजापेठ पोलिस ठाणे हद्दीतील दस्तूरनगर चौक येथील नाना-नानी स्पॉटवरील बाकड्यावर 40 ते 50 वयोगटातील अज्ञात व्यक्तीचा शनिवारी मृतदेह आढळला. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही. राजापेठ पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

## 'शी-बॉक्स' पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन

**अमरावती** - कामाच्या ठिकाणी महिलांचे होणारे लैंगिक शोषण रोखण्यासाठी केंद्र सरकारने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. महिला व बालविकास मंत्रालयाने 'शी-बॉक्स' हे ऑनलाइन तक्रार निवारण पोर्टल सुरू केले आहे. आता या पोर्टलवर सर्व खाजगी आस्थापनांना नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, 2013 च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. या कायद्यानुसार, ज्या आस्थापनांमध्ये 10 किंवा त्याहून अधिक कर्मचारी आहेत, तेथे अंतर्गत तक्रार निवारण समिती असणे आवश्यक आहे. 'शी-बॉक्स' पोर्टलमुळे महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या तक्रारी ऑनलाइन नोंदवणे आणि त्याचा पाठपुरावा करणे सोपे होणार आहे. तसेच, प्रशासनाला या तक्रारींवर वेळेत आणि प्रभावी कार्यवाही करणे शक्य होईल. सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी आस्थापनांनी या निर्देशांचे पालन करून आपल्या संस्थेची 'शी-बॉक्स' पोर्टलवर त्वरित नोंदणी करावी.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय आयत्यांचा सुळसुळाट

## पक्षनिष्ठ नेत्यांना सतर्क राहणे गरजेचे

**महासागर | बादल डकरे**

**चांदूर बाजार, ( दि. 8 ) - संपूर्ण राज्यात नगर परिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या कार्यक्रमाची घोषणा होताच राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापू लागले आहे. सर्व पक्ष उत्साहाने रणधुमाळीच्या तयारीत उतरले आहेत, तरीही एका महत्त्वाच्या समस्येची जाणीव होत आहे. ती म्हणजे पक्षनिष्ठ व कार्यसमर्पित कार्यकर्त्यांना बायपास करून, ऐन निवडणुकीच्या तोंडावर नव्याने उदयास येणाऱ्या 'आयत्यांचा' सुळसुळाट.**



निवडणुकीच्या काळात काही तथाकथित आयते पुढारी स्वार्थासाठी राजकारणात सक्रिय होतात. यांना कोणत्याही पक्षाशी दीर्घकालीन निष्ठा नसते; त्यांचा हेतू फक्त संधी साधणे असतो. हे लोक जुने पक्ष सोडून नवीन पक्षात प्रवेश करतात किंवा एकाच वेळी विविध पक्षांचा विचार करतात. परिणामी, दीर्घकाळ प्रामाणिकपणे काम करणारे कार्यकर्ते दुर्लक्षित होतात, पक्षांतर्गत नाराजी वाढते आणि बंडखोरीची शक्यता निर्माण होते. काही ठिकाणी तर आयत्यांमुळे पक्षांत फूट पडून निवडणुकीत मोठा फटका बसतो, असे अनेक अनुभव आहेत. अमरावती जिल्ह्यातील लोकसभा व विधानसभा निवडणूकानंतर राजकीय समीकरण बदलल्यामुळे, आता आयत्यांचा त्रास वाढणार आहे. त्यामुळे नेत्यांनी सावध भूमिका घेऊन पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांना साथ देणे गरजेचे आहे. निवडणुका येतील आणि जातील, पण खरे कार्यकर्ते व त्यांच्या योगदानाचे स्थान अमूल्य राहील.

### संधी साधुची पोजिशनसाठी धडपड

सध्या हे 'संधीसाधु' नव्या नेत्यांच्या संपर्कात आपली पोजिशन मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहेत. काहीजण समाजमाध्यमांचा वापर करून स्वत:ला मोठे कार्यकर्ते असल्याचे भासवू लागले आहेत. अशा परिस्थितीत पक्ष नेतृत्वाला खरे व एकनिष्ठ कार्यकर्ते ओळखणे कठीण झाले आहे. त्यामुळे नेत्यांनी आपल्या परिसरातील खरी कार्यकर्त्यांची पारख करून 'संधीसाधू आयत्यांपासून' सावध राहणे गरजेचे आहे. दीर्घकाळ निस्वार्थ सेवा करणारे कार्यकर्ते हेच पक्षाचे खरे आधारस्तंभ आहेत. तात्पुरती साथ करणाऱ्या बडव्यांपेक्षा, दीर्घकालीन निष्ठा असलेल्या कार्यकर्त्यांवर भर देणे आवश्यक आहे; अन्यथा पक्षाचे नुकसान होण्याची शक्यता असते.

# 13 ऑक्टोबरला ठरणार राजकीय भविष्य

## जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य पदांचे आरक्षण उलगडणार!

**महासागर | प्रतिनिधी**

**वरुड, ( दि. 8 )** - राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रंगत आता खरी सुरू होणार आहे. कारण 13 ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य पदांचे आरक्षण जाहीर होणार आहे. या आरक्षण सोडतीची आतुरतेने वाट पाहणाऱ्या इच्छुक उमेदवारांपासून ते सर्वसामान्य मतदारांपर्यंत सगळ्यांचे डोळे या प्रक्रियेवर खिळले आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून इच्छुकांची तयारी सुरू असली तरी अंतिम आरक्षण कोणत्या मतदारसंघात लागू होणार यावरच राजकीय गणित अवलंबून आहे. आरक्षणानंतरच अनेक नेत्यांचे भविष्य ठरेल, तर काहींची आशा धुळीस मिळणार आहे.राज्य शासनाने ठरविलेल्या निकषानुसार महिला, अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीयांसाठी मोठा वाटा आरक्षणात राहणार आहे. त्यामुळे महिलांसाठी राजकारणातील संधीचे दरवाजे आणखी खुलणार असून, ग्रामीण भागातील राजकीय नेतृत्वाची नवीन पिढी पुढे येण्याची शक्यता आहे.

### राजकीय समीकरणे पालटणार

आरक्षण जाहीर झाल्यानंतर अनेक मतदारसंघातील राजकीय चित्र पूर्णपणे बदलणार आहे. आजवर ज्या नेत्यांना सहज विजय मिळत होता, त्यांना आता



अडचणींचा सामना करावा लागू शकतो. तर काही नवीन चेहरे या सोडतीतून थेट पुढे येण्याची संधी मिळवतील. त्यामुळे 13 ऑक्टोबर हा दिवस केवळ एक औपचारिकता नसून, येत्या निवडणुकांचे राजकीय भविष्य ठरवणारा निर्णायक टप्पा ठरणार आहे असे जामगाव सेवा सहकारी सोसायटीचे संचालक विलास पाटील यांनी म्हटले आहे.

# खाजगी शाळांचा मनमानी कारभार?

## विद्यार्थ्यांवर आणि पालकांवर अन्यायाचा बोजा! ■ शिक्षण विभागाचे मौन प्रशासनावर प्रश्नचिन्ह






**महासागर | प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 8 )** - जिल्ह्यातील अनेक नामांकित खाजगी शाळांचा मनमानी कारभार दिवसेंदिवस वाढत असून, शिक्षणाच्या नावाखाली पालकांवर अवास्तव आर्थिक बोजा टाकला जात आहे. शुल्क थकलेली असल्यास विद्यार्थ्यांना वर्गात बसू दिले जात नाही, परीक्षा देण्यास रोखले जाते, निकाल थांबवला जातो, अगदी टीसीही रोखून ठेवली जाते, असे प्रकार वाढले आहेत.

### काय म्हणतो कायदा?

महाराष्ट्र शिक्षण संस्था (नियमन) अधिनियम 2011' आणि आरटीई कायदा 2009 नुसार, कोणत्याही शाळेला विद्यार्थ्यांना शुल्क न भरल्यामुळे शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा अधिकार नाही. शिक्षण विभागाने अशा शाळांवर दंडात्मक कारवाई करणे बंधनकारक आहे. तरीही शिक्षण विभाग मूकदर्शकाची भूमिका घेत असल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### शिक्षणतज्ज्ञांची चिंता

शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे की, अशा वागणुकीमुळे विद्यार्थ्यांच्या आत्मसन्मानावर व मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. शिक्षण हे फक्त गुणांसाठी नसून व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रक्रिया आहे, परंतु काही शाळांचा व्यापारी दृष्टिकोन ही प्रक्रिया उद्ध्वस्त करत आहे.

### पालक आणि प्रशासनाने काय करावे?

पालकांनी अशा घटनांविरोधात जिल्हा शिक्षण अधिकारी आणि शुल्क नियामक समितीकडे तक्रार दाखल करावी. जिल्हाधिकाऱ्यांनीही अशा शाळांविरुद्ध चौकशीचे आदेश द्यावेत, अशी मागणी होत आहे.अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या मनमानीवर शिक्षण विभाग कधी कारवाई करणार, आणि विद्यार्थ्यांना न्याय कधी मिळणार, हा प्रश्न आता प्रत्येक पालक आणि विद्यार्थ्याच्या मनात घर करून आहे.

### विद्यार्थ्यांवर मानसिक ताण

काही शाळांमध्ये लहान मुलांना वर्गाबाहेर उभे केले जाते, अशा अमानवी वागणुकीमुळे विद्यार्थ्यांच्या मनावर खोल मानसिक परिणाम होत आहेत. एका पालकाने सांगितले की, शुल्क थकले म्हणून माझ्या मुलीला परीक्षेत बसू दिले नाही. ती रडत घरी आली. अशा घटना पालकांच्या मनात संताप निर्माण करत आहेत.

# 74 लाभार्थ्यांना मिळाला हक्काचा निवारा

## सेवापंधरवड्यात उपविभागीय प्रशासनाची उल्लेखनीय कामगिरी

**महासागर | प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, ( दि. 8 )**- शासनाच्या विविध योजनांचा लाभ वंचित आणि गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी अचलपूर उपविभागात राबविण्यात आलेल्या 'सेवापंधरवडा' या विशेष उपक्रमाने अनेकांच्या आयुष्यात बदल घडवला आहे. या कालावधीत तब्बल 74 लाभार्थ्यांना हक्काची घरे मिळाली, तर 1792 नागरिकांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ देण्यात आला.

उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांच्या मार्गदर्शनाखाली चांदूरबाजार आणि अचलपूर तालुक्यांत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रभावीपणे राबविण्यात आले. या काळात 1249 दाखले व प्रमाणपत्रांचे वितरण झाले, ज्यात चांदूरबाजार तालुक्यातील 784 आणि अचलपूर तालुक्यातील 465 लाभार्थ्यांचा समावेश आहे. तसेच 20 लाभार्थ्यांना जमीनपट्टे देण्यात आले असून, आणखी तिघांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. महसुली नोंदी संदर्भात 2390 रस्त्यांची नोंद झाली असून, यातील 745 रस्ते प्रथमच नकाशावर दाखल करण्यात आले. यामुळे गावांच्या पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळेल.



या अभियानांतर्गत 138 गावांमध्ये ग्रामसभा घेण्यात आल्या, तर 357 गावांत शिवार फेऱ्याद्वारे जनजागृती करण्यात आली. अतिक्रमण हटवून 13 पांदन रस्त्यांचे सिमांकन करण्यात आले व रस्त्यांच्या दोन्ही बाजूंनी झाडे लावण्यात आली. तसेच 44 मयत खातेदारांच्या वारसांची नोंद सातबाऱ्यावर घेऊन नोंदी अद्ययावत करण्यात आल्या. स्मशानभूमीच्या समस्येवरही प्रशासनाने लक्ष केंद्रित केले असून 26 गावांसाठी प्रस्ताव पाठवण्यात आले आहेत.

याशिवाय विमुक्त जाती आणि भटक्या जमातींसाठी विशेष शिबिरे घेऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव म्हणाले, सेवापंधरवड्यात बेघरांना निवारा, रस्त्यांचे नोंदीकरण, प्रमाणपत्रांचे वाटप आणि अतिक्रमणमुक्ती यांसारखे उल्लेखनीय कार्य झाले आहे. नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवून हे कार्य सतत सुरू राहणार आहे. या उपक्रमामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील विश्वास दृढ झाला असून, अचलपूर उपविभागाने जनतेच्या सहभागातून विकासाचा आदर्श उभा केला आहे.

# भारताला २ जी साठी संघर्ष करावा लागला

■ **नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी दिल्लीतील यशोभूमी येथे आशियातील सर्वात मोठा दूरसंचार, मीडिया आणि तंत्रज्ञान कार्यक्रम असलेल्या इंडिया मोबाइल काँग्रेस (आयएमसी) २०२५ च्या नवव्या आवृत्तीचे उद्घाटन केले. पंतप्रधानांनी उपस्थितांना संबोधित केले.



ते म्हणाले, जेव्हा मी 'मेक इन इंडिया' बद्दल बोललो तेव्हा काही लोकांनी त्याची खिल्ली उडवली. त्यांना आता त्यांचे उत्तर सापडले आहे. एकेकाळी २ जीशी संघर्ष करणाऱ्या देशात आता प्रत्येक जिल्ह्यात ५ जी आहे. आज भारतात १ जीबी वायरलेस डेटाची किंमत एका कप चहापेक्षाही कमी आहे.

पंतप्रधान म्हणाले, भारताने मेड इन इंडिया ४ जी स्टॅक सुरू केला आहे. भारत आता ही क्षमता असलेल्या पहिल्या पाच देशांमध्ये आहे. संपूर्ण जग भारताची क्षमता ओळखत आहे. आपल्याकडे जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी दूरसंचार आणि ५जी बाजारपेठ आहे. भारतात गुंतवणूक, नवोन्मेष आणि उत्पादन करण्याची ही योग्य वेळ आहे.

# बसवर ढिगारा कोसळला १५ जणांचा मृत्यू

■ **शिमला :** हिमाचल प्रदेशातील बिलासपूर जिल्ह्यात एका प्रवासी बसवर डोंगराचा ढिगारा कोसळला. वृत्तसंस्था पीटीआयने १८ जणांचा मृत्यू झाल्याचा दावा केला आहे, तर पोलिस अधीक्षकांनी १५ जणांची पुष्टी केली आहे. बसमध्ये अडकलेल्या दोन मुलांना वाचवण्यात आले. अपघातानंतर लगेचच एसडीआरएफ, पोलिस आणि स्थानिक रहिवासी मदत आणि बचाव कार्यात गुंतले आहेत.

पोलिस अधीक्षक संदीप धवल यांनी सांगितले की, बहुतेक ढिगारा हटवण्यात आला आहे. बसमध्ये आणखी काही प्रवासी अडकले आहेत का याची खात्री करण्यासाठी काही उरलेले दगड जलदगतीने काढण्यात येत आहेत. तथापि, असे दिसते की, बसमध्ये फक्त १८-१९ लोक होते.

हिमाचल प्रदेशातील बहुतेक भागात पाऊस पडत आहे. यामुळे सायंकाळी ६:२५ वाजता बर्थिनजवळील भालू येथे अचानक डोंगराचा ढिगारा बसवर कोसळला. बस मारोटनहून घुमरविनला जात होती. अपघातानंतर बसचे फक्त छतच दिसत होते. स्थानिक रहिवाशांकडून माहिती मिळताच पोलिस आणि प्रशासन घटनास्थळी पोहोचले. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २ लाख रुपये मदत दिली जाईल. जखमींना प्रत्येकी ५०,००० रुपये मदत दिली जाईल.

# अपघाताशी संबंध नाही..

■ **पुणे:** पुण्यातील नवले पूलावर 30 सप्टेंबरला पहाटे झालेल्या अपघात प्रकरणामुळे नृत्यांगना गौतमी पाटील अडचणीत आली आहे. तिच्या मालकीच्या कारने एका रिक्षाला धडक दिल्याने रिक्षाचालक सामाजी विठ्ठल मरगळे गंभीर जखमी झाले होते. या घटनेवर प्रथमच गौतमीने प्रतिक्रिया दिली आहे.

अपघात झाला तेव्हा ती गाडीत नव्हते, तिला उगाच बदनाम केले जात आहे आणि ट्रोल केले जात असल्याचे गौतमीने सांगितले. ही गाडी फक्त माझी होती. माझा या सगळ्या अपघाताशी काहीही संबंध नसल्याचे गौतमीने स्पष्ट केले आहे. मी दुसरीकडे होते, विनाकारण या सगळ्या प्रकरणात मला ट्रोल केले गेले, असे ती म्हणाली.

# देश पुन्हा मागे नेण्याचा प्रयत्न

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**
सरन्यायाधीशांवरील बूटफेक प्रकरण आणि कस्तुरबा रुग्णालयातील परिचारिकेच्या प्रकरणामुळे भारत देश पुन्हा काही शतके मागे नेण्याचा प्रयत्न होत असल्याच्या द्योतक आहेत, असा दावा काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांनी केला आहे.

मागील ११ वर्षांत देशाला काही शतके मागे नेण्याचा प्रयत्न फार दूरवर गेला आहे. देशाला मनुवादाची मगरमिठी आवळत चालली आहे. कस्तुरबा रुग्णालयातील परिचारिका व सुप्रीम कोर्टातील वकिलाची कृती हे त्याचे निदर्शक आहे, असे ते म्हणालेत.

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर सोमवारी सुप्रीम कोर्टात बूट फेकण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी कस्तुरबा रुग्णालयातील एका परिचारिकेने प्रबोधनकार ठाकरे याचे पुस्तक फेकून दिल्याची घटना घडली. या दोन्ही घटनांमुळे महाराष्ट्रासह देशाचे राजकारण ढवळून निघाले आहे. या पार्श्वभूमीवर सचिन सावंत यांनी उपरोक्त दावा केला आहे.



ते म्हणाले, रात्र वैऱ्याची आहे. समाज सुधारण्यासाठी धर्मचिकित्सा आवश्यक असते. ज्ञानाचा मार्ग चिकित्सेतूनच पुढे जातो. जो समाज धर्म चिकित्सा करत नाही तो धर्मांध, अंधश्रध्द आणि अज्ञानाच्या अंधःकारात जात असतो. जर धर्मचिकित्सा झाली नसती तर स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळाला नसता, सती प्रथा बंद झाली नसती, स्त्री समानतेची व सन्मानासाठी पावले उचलली गेली नसती आणि अस्पृश्यतेची प्रथा बंद करण्यासाठीही पावले उचलली गेली नसती.

**धर्म चिकित्सा न होणारा समाज धर्मांध**

महाराष्ट्रात समाज सुधारण्यासाठी धर्मचिकित्सा ही संतांनी आणि वारकरी संप्रदायाने केली. तुकोबा, गाडगे महाराजांनी केली.. शिवरायांनी आणि छत्रपती शाहू महाराजांनी कृतीच्या माध्यमातून केली. पुढे महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांनी जे आसूड ओढले त्यातून ही चळवळ पुढे गेली.

महाराष्ट्रावर पुरोगामी विचारांचे जे संस्कार झाले ते दुर्दैवाने उत्तर भारतात झालेले दिसत नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्माधिष्ठित वर्णव्यवस्थेविरोधात शोषणमुक्त समाजासाठी धर्मचिकित्सा होण्यासाठीच्या संघर्षाची परिणती म्हणून संविधान हे पुढे साधन ठरले, समता आणि अधिकारांची दिशा संविधानामुळे मिळाली. व्हॉट्सएप युनिव्हर्सिटीच्या माध्यमातून मनुवादाला पगडा पुन्हा दृढमूल करण्यासाठी प्रयत्न होत असल्याचे ते म्हणाले.




■ ***छत्रपती संभाजीनगर :*** *सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे संपूर्ण महाराष्ट्रात ६ लाख हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी तुटपुंजी मदत जाहीर केली असल्याचा आरोप शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे. त्यामुळेच छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हाधिकारी आणि तहसील कार्यालयावर पक्षाच्या वतीने हंबरडा मोर्चा काढण्यात आला.*

# अक्षय शिंदे एन्काउंटर प्रकरणात पोलिसांना 'क्लीनचीट'

## न्या. दिलीप भोसले आयोगाकडून दिलासा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ८ :**
बदलापूरमधील शाळकरी मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदेच्या एनकाऊंटरची चौकशी करणाऱ्या न्या. दिलीप भोसले न्यायालयीन आयोगाने मोठा निकाल दिला आहे.



या आयोगाने एनकाऊंटर करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांना निर्दोषत्व बहाल करत क्लीनचीट दिली. आयोगाने पोलिसांचा स्वसंरक्षणासाठी गोळीबार केला हा दावा ग्राह्य धरला. मात्र आरोपीला व्हॅनमधून नेण्याच्या प्रक्रियेवर आयोगाकडून काही प्रश्न देखील यावेळी उपस्थित केले आहे.

पोलिसांनी आरोपी अक्षय शिंदेच्या केलेल्या एन्काउंटरवर प्रश्नचिन्ह उभे राहिले होते. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने एसआयटी स्थापन करून चौकशीचे आदेश दिले होते. तर ही एसआयटी कोर्टाने नव्हे, तर डीजीपींना स्थापन करावी, असे आदेश सुप्रीम कोर्टाचे होते. आता न्या. दिलीप भोसले आयोगानेही पोलिसांना निर्दोष ठरवल्याने या वादावर पडदा पडण्याची शक्यता आहे.

न्या. दिलीप भोसले यांच्या आयोगाने 'स्वसंरक्षणासाठी' अक्षय शिंदेवर गोळीबार केल्याचा पोलिसांचा दावा मान्य केला आहे. या निर्णयामुळे एन्काउंटर करणा?या पोलिसांना कायदेशीर दिलासा मिळाला आहे. यापूर्वी अक्षय शिंदेच्या कुटुंबीयांनी कोणतीही तक्रार केली नसल्यामुळे राज्य मानवाधिकार आयोगाकडूनही पोलिसांना क्लीनचीट मिळाली होती.

**व्हॅनमधून नेण्याच्या प्रक्रियेवर आयोगाचा सवाल**

गोळीबार स्वसंरक्षणासाठी झाल्याचा दावा मान्य केला असला तरी, आयोगाने आरोपीला व्हॅनमधून नेण्याच्या प्रक्रियेवर मात्र काही प्रश्न उपस्थित केले आहेत. आयोगाने या प्रक्रियेत काही त्रुटी आढळल्याचे संकेत दिले आहेत. मात्र, एकूण एन्काउंटर प्रकरणात पोलिसांना 'क्लीनचीट' मिळाल्याने पोलिसांना दिलासा मिळाला आहे.

**नेमके प्रकरण काय आहे?**

ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथील एका शाळेत दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याच्या घटनेतील मुख्य आरोपी शाळेतील सफाई कर्मचारी अक्षय शिंदे होता. २३ सप्टेंबर २०२४ रोजी अक्षय शिंदे याचा तळोजा तुरुंगात नेत असताना पोलीस चकमकीत मृत्यू झाला होता.

हा एन्काउंटर बनावट असल्याचा आरोप करण्यात आला होता. यानंतर एन्काउंटरची एसआयटीमार्फत चौकशी करण्यात आली. एसआयटी चौकशीनंतर मुंबई हाय कोटाने या प्रकरणात पाच पोलिसांना जबाबदार धरून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते.

सरकारी वकिल हितेने वेणेगावकर यांनी ३ मे पर्यंतची मुदत मागितली होती. ही मदत शनिवारी संपली होती. मात्र, तरीही गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या ७ एप्रिलच्या आदेशाविरोधात राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

# महिलेला मारहाण करीत पाय तोडण्याचा प्रयत्न

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. ८**
शेतीच्या वादातून एका महिलेचे पाय तोडण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची खळबळजनक घटना बीड जिल्ह्यातील अंजनवती गावात घडली आहे.

या घटनेत गंभीर जखमी झालेल्या महिलेवर बीड जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तिथे तिची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. दरम्यान, अन्य एका घटनेत वकील राहुल आघाव यांनी बीड जिल्हा कारागृहात काही कैद्यांवर धर्मांतरासाठी दबाव टाकण्यात येत असल्याचा आरोप केला आहे. या घटनेमुळेही खळबळ माजली आहे.

# रात्री १० नंतर फटाके वाजवण्यास बंदी

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ८**
दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिस आयुक्तालयाने फटाके विक्री आणि वाजवण्यासंबंधी नियम जाहीर केले आहेत. नागरिकांनी नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे.

फटाक्यांच्या आवाजामुळे होणारे ध्वनी आणि वायू प्रदूषण टाळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हे निर्बंध लागू करण्यात आले आहेत. यामध्ये रात्री १० ते सकाळी ६ या वेळे फटाके वाजवण्यास निर्बंध घालण्यात आले आहे.

पोलिसांनी जाहीर केलेल्या नियमांनुसार, 'ॲटमबॉम्ब' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विशिष्ट स्फोटक फटाक्यांच्या उत्पादनावर आणि जवळ बाळगण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. तसेच, कोणत्याही नागरिकाला रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत ध्वनी निर्माण करणारे फटाके वाजवता येणार नाहीत. रुग्णालये, शैक्षणिक संस्था आणि न्यायालये यांच्या १०० मीटर परिसरात म्हणजेच शांतता प्रभागात कोणत्याही वेळेत फटाका वाजवण्यास सक्त मनाई आहे.

विक्रेत्यांसाठीही नियम कडक करण्यात आले आहेत. पुणे शहरात २० ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर या काळातच तात्पुके विक्री परवाने वैध असतील.

# रुग्णालय, सरकारी कार्यालये सर्वत्र जातीवाद

## न्या. गवईंवरील हल्ल्यांवर ॲड. प्रकाश आंबेडकर संतप्त

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**
सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ला ही केवळ एक घटना नसून, एक सूचक संदेश असल्याचा इशारा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी बुधवारी दिला.



देशातील सर्वोच्च घटनात्मक पदावर बसलेल्या व्यक्तीलाही जातीच्या आधारावर निशाणा बनवण्यात येत असेल, तर पुढील नंबर दलित आयएएस अधिकारी, डॉक्टर्स व सरकारी अधिकाऱ्यांचा असू शकतो, अशी भीती त्यांनी या प्रकरणी व्यक्त केली आहे.

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर सोमवारी एका वकिलाने बूट फेकण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे देशाच्या न्यायव्यवस्थेत एकच खळबळ माजली आहे. सर्वच लहानथोर नेत्यांनी या घटनेचा निषेध करत आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी वरील भीती व्यक्त केली आहे. जातीवर आधारित अत्याचार हा एकेकाळी केवळ गावांपुरते मर्यादित असलेले क्रूर वास्तव मानले जात होते. तिथे जातीव्यवस्था उघडपणे व हिंसकपणे लागू केली जात असे. शहरातील भेदभाव एक मूक मुखवटा घातलेला होता. कार्यालये, रुग्णालये व सरकारी कार्यालयांच्या भिंतींमध्ये लपला होता. पण आता असे नाही. सरन्यायाधीश गवई यांच्यावरील अलिकडे झालेला हल्ला हा जातीभेद आता चार भिंतीमधून बाहेर पडल्याचा स्पष्ट पुरावा आहे.

देशातील सर्वोच्च घटनात्मक पदावर बसलेल्या व्यक्तीलाही जातीच्या आधारे लक्ष्य केले जाऊ शकते, तेव्हा दलित आयएएस अधिकारी, डॉक्टर व सरकारी अधिका?यांसाठी याचा काय अर्थ होतो? पुढचा नंबर आयएएस अधिकारी, डॉक्टर व सरकारी अधिकारी असू शकतात. त्यामुळे ही फक्त एक घटना नाही. हा एक संदेश आहे, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

आंबेडकरांनी यापूर्वीही सरन्यायाधीशांवरील हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला होता.

भारतीय समाजाला खरोखरच प्रगती करायची असेल, तर त्यांना उच्च पदांवर असलेल्या शूद्र आणि अतिशूद्रांबद्दल खोलवर रुजलेले जातीय पूर्वग्रह सोडून दिले पाहिजेत. ज्ञान, शहाणपण आणि नेतृत्व हे केवळ सनातनी किंवा तथाकथित उच्चवर्णीयांचे अधिकार क्षेत्र नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

# साडेसात लाखांचे मेफेड्रोन जप्त

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ८**
पुण्यात अंमली पदार्थ विरोधी पथकाने मोठी कारवाई करत मेफेड्रोन (एमडी) तस्करी करणाऱ्या चार जणांना अटक केली आहे. त्यांच्याकडून ७.५ लाख रुपये किमतीचे ३७.६० ग्रॅम मेफेड्रोन आणि एकूण ९ लाख ३७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे मतीन हुसेन मेमन (वय २५, रा. हादीया हाईटस, कोंढवा), फैजल नौशाद मोमीन (वय २६, रा. साईबाबानगर, कोंढवा खुर्द), फैयाज युसुफ शेख (वय ३६, रा. मारुती आळी, गणपती चौक, कोंढवा) आणि सूरज राजेंद्र सरतापे (वय २८, रा. चिमटा वस्ती, फातिमानगर, पुणे-सोलापूर रस्ता) अशी आहेत. हे सर्व सराईत गुन्हेगार आहेत.

अमली पदार्थ विरोधी पथकाला माहिती मिळाली होती की, हे चौघे महंमदवाडीतील वन विभागाच्या मोकळ्या जागेत मेफेड्रोन विक्री करण्याच्या तयारीत थांबले होते. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून त्यांना पकडले. त्यांच्याकडून मेफेड्रोनसह ९ लाख ३७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# श्री बालाजी जेष्ठ नागरीक संघाची नवीन कार्यकारिणी गठीत

■ **महासागर प्रतिनिधी मेहकर, दि. ८ :**
बालाजी जेष्ठ नागरिक संघाची सभा पी. एम. गायकवाड यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेला उपाध्यक्ष प्राचार्य सत्यनारायण लोहीया, सचिव नरेश मिनासे, प्रकाश बावणे, अरविंद वाडकर, नत्थू खंडारे, प्रा. अशोक सारडा, रामदास राजेगावकर, प्रा वसंत गिरी, द्वारकादास शर्मा व इतर सदस्य उपस्थित होते.



प्रा. अशोक सारडा



रामदास राजेगावकर

सभेमध्ये बालाजी जेष्ठ नागरिक संघाची तीन वर्षासाठी नूतन कार्यकारिणी सर्वानुमते निवडण्यात आली. त्यात अध्यक्ष प्रा. अशोक श्रीकिसन सारडा, उपाध्यक्ष माजी प्राचार्य स. बा. लोहीया आणि प्रा . वसंत गिरी, सचिव रामदास राजेगावकर, कोषाध्यक्ष द्वारकादास शर्मा, कार्यकारणी सदस्य पां. मा. गायकवाड, नरेश मिनासे, न. ल. खंडारे, प्रकाश बावणे, व अरविंद वाडकर यांची निवड करण्यात आली.

सभेच्या सुरूवातीला दिवगंत सदस्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली . नूतन कार्यकारणी सदस्यांचे पुष्प गुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. ज्या जेष्ठ नागरीकांनी अद्याप आयुष्यमान कार्ड काढलेले नाही, त्यांनी संघाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# २१ ऑक्टोबर रोजी दिवाळी लक्ष्मी पुजा



■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ८ :**
विविध ऋषींच्या मतांचा हवाला देऊन निर्णय सिंधू पृष्ठ ३०० वर लिहितात की प्रदोष हा दिवाळी पूजेसाठी सर्वात महत्वाचा काळ आहे. लक्ष्मीचे स्वागत करण्यासाठी रात्रीचा काळ मानला जातो.

दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंतचा काळ पूर्वजांच्या पूजेसाठी मानला जातो. दोन दिवसांत प्रदोषाच्या वेळी अमावस्या पडते तेव्हा दुसऱ्या दिवशी लक्ष्मी पूजेला महत्त्व दिले जाते. धर्मसिंधूमध्ये पृष्ठ १७७ आणि १७८ मध्ये, एकम तिथीतील वाढ, दुसऱ्या दिवशी प्रदोषाच्या वेळी अमावस्या आणि सूर्योदयापासून साडेतीन प्रहरांपेक्षा जास्त अमावस्या यांना महत्त्व दिले आहे. असे अनेक निर्णय देण्यात आले आहेत, एक घटी, म्हणजे २४ मिनिटे. विठ्ठल सोमण यांनी सुलभ ज्योती शास्त्रात हा विषय अतिशय सोप्या पद्धतीने स्पष्ट केला आहे.

या आधारावर अकोला आणि गुवाहाटी, कोलकाता इत्यादी पूर्वेकडील प्रदेशांमध्ये, २१ ऑक्टोबर रोजी दिवाळी खरी आहे. अमेरिकेसारख्या पाश्चात्य देशांमध्ये, २० ऑक्टोबर रोजी दिवाळी साजरी केली जाईल.

या संदर्भात, अकोला पुरोहित संघटनेची बैठक बालाजी मंदिरात झाली, जिथे दिवाळीसाठी शुभ काळ जाहीर करण्यात आले. त्यात चटई घालणेः दुपारी २:२७ ते ४:०० वाजेपर्यंत, शाईने पेन भरणेः दुपारी १२:३८ ते २:२७,

दुपारी ३ ते ४ लक्ष्मी पूजाः देवी लक्ष्मीची पूजाः स्थिर लग्नात. वृश्चिकः सकाळी ८:१७ ते १०:३२ वाजेपर्यंत. कुंभः दुपारी २:२७ ते ४:०२ वाजेपर्यंत. वृषभः संध्या ७:१७ ते ९:१६ वाजेपर्यंत. लोकप्रिय मान्यतेनुसार, सिंह लग्न मध्यरात्री १:४३ ते ३:५३ पर्यंत असते.

यासह अन्य विधीच्या वेळा निर्धारीत करण्यात आल्या. रात्री ९ नंतरचे शुभ काळ लोक रीतिरिवाजांवर आधारित आहेत. २१ ऑक्टोबर रोजी अमावस्या संध्याकाळी ५:५४ वाजेपर्यंत राहील. तथापि, ज्याप्रमाणे एकादशी सकाळी ६:०० वाजता संपते, त्याचप्रमाणे अमावस्या देखील संपूर्ण दिवस उपवास करावा लागेल.

बैठकीत पंडित सचिन शर्मा, दीपक शर्मा, गोपाल शर्मा, प्रमोद तिवारी, रतन तिवारी, श्याम अवस्थी, लाला तिवारी, राजू भाई जाडा, आलोक शर्मा, सुमित तिवारी, भैरव शर्मा, हेमंत शर्मा आणि पंडित रवी कुमार शर्मा उपस्थित होते.

# 'बेवड्या' म्हणाली म्हणून आईचा खून

## आईच्या हत्येच्या दोन घटना नाशिक शहर हादरले

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. ८ :**
नाशिक शहरात माणुसकीला काळिमा फासणाऱ्या दोन घटना उघडकीस आल्या आहेत. नाशिक रोड येथे एका मुलाने आपल्या आईच्या वृद्ध-पणाला कंटाळून तिचा गळा दाबून खून केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी नाशिक रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

दुसरीकडे, सातपूर कॉलनीतील श्रीराम चौक येथे सेवानिवृत्त प्रकल्प अधिकारी मंगला गवळी (६०) यांचा खून झाला आहे. उच्चशिक्षित मुलगा स्वप्नील संतोष गवळी (३६) याने आई त्याला 'बेवडा' (दारुडा) म्हणते याचा राग आल्याने तिच्या डोक्यात शस्त्राने वार करून तिला ठार केले. पोलिसांनी खाक्या दाखवताच स्वप्नीलने खुनाची कबुली दिली आहे. नाशिकमध्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी मुलांनीच जन्मदात्या मातांचा क्रूरपणे खून केल्याच्या या घटनांनी परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी माहिती दिली की, जेल रोडच्या शिवाजीनगर परिसरातील ८५ वर्षांच्या यशोदाबाई मुरलीधर पाटील या वार्धक्यामुळे आजारी होत्या. त्यांचा मुलगा अरविंद मुरलीधर पाटील (५८, रा. शिवाजीनगर, जेलरोड, नाशिक रोड) हा त्यांच्या वृद्ध-पणाला आणि त्यामुळे येत असलेल्या आजारपणाला कंटाळला होता. अखेर त्रस्त झालेल्या या पोटच्या मुलाने आईचा गळा दाबून तिला संपवल्या-ची कबुली स्वतः पोलिस ठाण्यात येऊन दिली.

सातपूर कॉलनीच्या श्रीराम चौकातील सेवानिवृत्त प्रकल्प अधिकारी मंगला गवळी (६०) यांचा उच्चशिक्षित मुलगा स्वप्नील संतोष गवळी (३६) याने आई बेवडा म्हणते याचा राग येत असल्याने तिच्या डोक्यात शस्त्राने वार करून तिला ठार केले. पोलिसांनी त्याला खाक्या दाखविताच त्याने खुनाची कबुली दिली आहे. या दोन घटनांनी नाशिक शहर हादरले आहे.

# पंढरपूरमध्ये होणार व्हॉईस ऑफ मिडियाचे राज्य अधिवेशन

## अडीच हजार पत्रकार होणार सहभागी : ज्येष्ठ पत्रकार व नेत्यांची उपस्थिती

■ **वृत्तसंस्था, पंढरपूर, दि. ८ :**
व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरमचे राज्य अधिवेशन यंदा शनिवार १५ आणि रविवार १६ नोव्हेंबर २०२५ रोजी श्री श्री राधा पंढरीनाथ मंदिर, इस्कॉन पंढरपूर येथे सकाळी ९ ते रात्री ११ यावेळेत होणार आहे. संघटनेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी पंढरपूर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

महाराष्ट्रातून सुरू झालेली आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटना व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम आज ५६ देशांपर्यंत पोहोचली असून तब्बल ६ लाख ७० हजार पत्रकार या संस्थेमध्ये पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. पत्रकारांसाठी जगभरात निर्माण झालेली ही केवळ एक सामाजिक चळवळ नसून, पत्रकारांना सक्षम करण्यासाठीचे मोठे व्यासपीठ ठरले आहे.



पत्रकारांचे निवास, आरोग्य, संरक्षण यांसारखे मूलभूत प्रश्न सोडवणे तसेच पत्रकारितेची गुणवत्ता आणि व्यावसायिकता उंचावण्याचे काम या व्यासपीठातून घडून आले आहे. देशभरातील पत्रकारांनी पत्रकारांसाठी उभारलेले हे एक ऐतिहासिक व्यासपीठ आहे.

या अधिवेशनासाठी इस्कॉनचे प्रल्हाद दास महाराज, श्री.परमात्मा दास व शंकरदास महाराज यांचे सहकार्य लाभणार आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मान्यवरांसह महाराष्ट्रातील प्रमुख पदाधिकारी या अधिवेशनात सहभागी होणार आहेत. एकूण अडीच हजार पत्रकारांचा सहभाग अपेक्षित आहे.

पत्रकारांच्या सर्वांगीण विकासासाठी हे अधिवेशन महत्त्वाचे ठरणार असून, विविध मान्यवरांच्या विशेष मुलाखती घेण्यात येतील. लोकशाहीचा आधारस्तंभ असलेली पत्रकारिता अधिक सक्षम आणि अबाधित कशी राहील, यावर चर्चा होणार आहे. अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पत्रकार आणि राजकीय मंडळींना अधिवेशनासाठी निमंत्रित केले आहे.

# मंजुळेंच्या 'झुंड' मधील कलाकाराची हत्या

## दारूच्या नशेत वाद : मित्रानेच केला घात



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते नागराज मंजुळे यांच्या झुंड या चित्रपटातील एका अभिनेत्याची नागपूरच्या जरीपटका भागात हत्या करण्यात आल्याची भयंकर घटना घडली आहे. ही हत्या त्याच्या मित्रानेच केली. दारू पिण्याच्या किरकोळ कारणातून हे हत्याकांड घडल्याची माहिती आहे.

प्रियांशू क्षत्रिय असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने झुंड या हिंदी चित्रपटात बीग बी अमिताभ बच्चन यांच्यासोबत 'बाबू छत्री' नामक पात्र केले होते. या पात्रामुळे त्याला खूप लोकप्रियता मिळाली होती. त्याची नागपूरच्या जरीपटका भागात हत्या झाली. त्याच्याच मित्राने धारदार चाकूचे वार करीत आधी बाबू छत्रीचा गळा चिरला. नंतर दगडाने ठेचून त्याचा चेहराही विद्रूप केला.

जरिपटका पोलिस हद्दीतल्या नारा जवळच्या पडक्या निर्मनुष्य घरात मध्यरात्री दोनच्या सुमारास ही खुनाची थरारक घटना घडली.

गजानन नगरितल्या एका निर्माणाधिन इमारतीला लागून हे घर आहे. तिथेच बाबू आणि त्याचे नशेडी मित्र नेहमी दारू, गांजा आणि व्हाईटनरची नशा करत बसायचे. या पडिक घरात प्रियांशू आणि त्याचा दुसरा कुख्यात मित्र ध्रूव साहू या दोघांनी यथेच्छ मद्य प्राशन केले. दारूच्या नशेत दोघांमध्ये कडाक्याचे भांडण झाले.

वाद विकोपाला गेल्यानंतर आधी बाबू छत्रीने आपल्याकडील चाकू काढला. त्याचा हा वार चुकवत ध्रुवने बाबूच्या हातातून चाकू हिसकावला आणि त्याच्याच चाकूने बाबूवर हल्ला चढवला. ध्रुवने बाबूच्या गळ्यावरही चाकूचा वार केला.

रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या बाबूच्या डोक्यात दगड घालून ध्रुव घटनास्थळावरून पसार झाला. याची माहिती मिळताच सकाळी जरिपटका पोलिस ठाण्यातील पथक घटनास्थळी धावले. अवघ्या ६ तासांच्या आत गुन्हे शोध विभागाने ध्रुव शाहू याला अटक केली.

गुन्हेगारी प्रवृत्तीचा प्रियांशू उर्फ बाबू याच्यावर यापूर्वीही विविध पोलीस ठाण्यात गंभीर स्वरुपाचे पाच गुन्हे दाखल आहेत. झुंड चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर त्याला मानकापूरातील पाच लाख रुपयांच्या चोरी प्रकरणात पोलिसांनी अटक केली होती. बाबू छत्रीचा खून करणारा ध्रुव साहू याच्या विरोधातही जरिपटका पोलिस ठाण्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.

दिग्गज अभिनेते अमिताभ बच्चन यांची भूमिका असलेल्या झुंड चित्रपटाचे नागपुरातल्या गड्डीगोदाम परिसरातील झोपडपट्टीत चित्रिकरण झाले होते. या चित्रपटात प्रियांशू क्षत्रियने बाबू नावाचे पात्र साकारले होते. त्यानंतही प्रियांशूच्या गुन्हेगारी वृत्तीत सुधारणा झाली नव्हती. चित्रपट प्रदर्शित झाल्याच्या अगदी काही दिवसांतच प्रियांशूला पोलिसांनी पाच लाख रुपयांच्या दागीने चोरी प्रकरणात अटक केली होती. या खेरीज त्याच्याकडून गड्डीगोदाम परिसरातल्या एका कबुतराच्या पेटीतून पोलिसांना चोरीच्या वस्तू सापडल्या होत्या.

प्रियांशू हा एक चांगला फुटबॉलपटू होता. यामुळे त्याची झुंड या चित्रपटासाठी निवड झाली होती. चुकीच्या संगतीत पडून त्याला अंमली पदार्थांचे व्यसन लागले. प्रियांशूचे वडील रोजंदारी मजूर आहेत. त्याला तीन मोठ्या बहिणीही आहेत.

# लोकशाही मूल्यांवर थेट आघात

## सरन्यायाधीशांवरील हल्ला प्रकरणी आ. तुमाने यांचा संताप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :



सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर न्यायालयीन कार्यवाहीदरम्यान झालेल्या भ्याड हल्ल्याच्या प्रयत्नाचा मी तीव्र निंदा करतो. हा प्रकार केवळ एका व्यक्तीवर नाही, तर तो भारतीय न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्यावर आणि लोकशाही मूल्यांवर थेट आघात आहे, अशा शब्दात शिवसेना गटाचे माजी खासदार व विधान परिषद सदस्य कृपाल तुमाने यांनी निषेध व्यक्त केला.

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याचा त्यांनी समाजमाध्यमावर निषेध नोंदविला. ते म्हणाले की, भर न्यायालयात एका वकिलाकडून बूट फेकण्याचा प्रयत्न हा अत्यंत लाजीरवाणा आणि खेदजनक आहे. अशा प्रकारचे कृत्य करणे हे संविधानविरोधी आहे.

न्यायमूर्ती भूषण गवई हे संविधानाचे निष्ठावंत रक्षक आणि समाजातील सर्व घटकांना समान न्याय देण्याचे कार्य सतत करत आले आहेत, अशी प्रतिक्रिया तुमाने यांनी दिली. तुमाने यांनी सरन्यायधीश गवई यांना पूर्ण पाठिंबा व्यक्त करताना त्यांनी या घटनेला ज्या संयमाने, शिस्तीने आणि न्यायनिष्ठ भूमिकेने हाताळले, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे.

दोन दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयातील एका सुनावणीदरम्यान एका वकिलाने सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या दिशेने बूट फेकण्याचा प्रयत्न केला होता. त्या वेळी सुनावणी चालू असताना वकील राकेश किशोर तिवारी या ७१ वर्षांच्या वकिलाने सरन्यायाधीश गवई यांच्या समोर जाऊन आपल्या पायातील बूट काढले आणि त्या दिशेने फेकण्याचा प्रयत्न केला. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी तत्काळ हस्तक्षेप करून हा हल्ला रोखला, असे प्रत्यक्षदर्शी वकिलांनी माध्यमांना सांगितले.

तसेच कोर्टरूम बाहेर सुरक्षा रक्षकांनी आणल्याने हल्लेखोर वकीलाने सनातन धर्माचा अपमान सहन करणार नाही अशी घोषणा दिल्याचे प्रत्यक्षदर्शीचे म्हणणे आहे.

या घटनेनंतर राज्यभरात वकील संघटना, कायदे व्यावसायिक आणि सार्वजनिक नेते यांनी तीव्र निंदा केली. बार कौन्सिल ऑफ इंडिया ने या वकीलाविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची प्रक्रिया सुरु केली आहे. हल्लेखोरी वकीलावर तातडीने त्यांची प्रॅक्टिस स्थगित करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

काही वृत्तांनुसार, सर्वोच्च न्यायालयाचा रजिस्ट्रार जनरल यांनी त्या वकिलावर त्वरित गुन्हा दाखल न करण्याचा निर्णय घेतल्याचेही सांगितले आहे.

या घटनेमुळे न्यायसंस्थेतील सुरक्षा वाढवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या घटनंतर राज्यात ठिकठिकाणी हल्लेखोराविरुद्ध गुन्हा दाखल करून कठोर कारवाईची मागणी होत आहे. तसेच अशाप्रकारे मनुवादी प्रवृत्तीचा लोकशाही आणि न्यायव्यस्थेवर विश्वास नाही. त्यामुळे या प्रवृत्तींना डोकेवर काढण्याची संधी दिल्यास अराजक माजेल, असेही काहींचे म्हणणे आहे.

## पान १ वरून...

### दहशतवादी हल्ल्यानंतर कोणाचा....

रेल्वे, रस्ते मार्ग, विमानतळ, मेट्रो, इलेक्ट्रिक बस अशा प्रत्येक सुविधांवर अभूतपूर्व गुंतवणूक होत आहे. अटल सेतू आणि कोस्टल रोड सारखे प्रकल्प तयार झाले आहेत. वाहतुकीच्या प्रत्येक मार्गाला आपआपसात जोडण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे नरेंद्र मोदी यावेळी बोलताना म्हणाले.

आज मेट्रोलाईनचे लोकार्पण झाले आहे. मात्र, या वेळी मला काही लोकांची आठवण होते. या मेट्रोलाईचे भूमिपूजन देखील मी केले होते. त्यामुळे मुंबईकरांना आशा वाटत होती की, त्यांचे जीवन सुखर होईल. मात्र, मधल्या काळात ज्या लोकांची सत्ता आली. त्यांनी याचे कामच थांबवले. त्यांना सत्ता मिळाली मात्र देशाचे हजारो कोटी रुपयांचे नुकसान झाले. आता मेट्रो लाईन पूर्ण झाल्यामुळे ज्या प्रवसाला दोन अडीच तासांचा वेळ लागत होता, तो ३० मिनिटांचा झाला आहे. एकएक मिनिटांचे महत्त्व असलेल्या मुंबईला दोन-तीन वर्षापर्यंत या सुविधा पासून वंचित राहील राहावे लागले.

शाळेतील विद्यार्थ्यांना देखील नवीन टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण मिळणार आहे. महाराष्ट्रातील युवकांना यासाठी मी अनेक शुभेच्छा देत असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. या प्रसंगी मला महाराष्ट्राचे सुपुत्र दि. बा. पाटील यांची देखील आठवण येत आहे. त्यांनी समाजासाठी शेतकऱ्यांसाठी सेवा भावाने काम केले. ते आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत, असेही मोदी यावेळी म्हणाले.

**केंद्रीय मंत्र्यांचे मराठीत भाषण**

स्वप्ननगरी मुंबईतून अनेकजण इतर देशात जाण्यासाठी गरुड भरारी घेतात. त्या सर्वांना भरारी घेणारी एक अमूल्य भेट आज लोकार्पण करत असल्याचे केंद्रीय उड्डयन मंत्री किंजरापू राममोहन नायडू मराठीतून भाषण देत म्हणाले. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आपल्या भाषणात केंद्राच्या योजनांचा उल्लेख करीत मोदींचा गौरव केला.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुंबई येथे दिव्यांग मुलांसोबत संवाद साधला.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अंदाजे १,१६० हेक्टर (११.६ चौरस किलोमीटर) वर बांधले जात आहे आणि ते अनेक टप्प्यात बांधले जाईल. या प्रकल्पात चार टर्मिनल समाविष्ट आहेत.

# जरांगेंना बालिशपणाच शोभतो..

## राहुल गांधींबाबत टीकेला विजय वडेट्टीवारांचे प्रत्युत्तर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :



मनोज जरांगे हे लहान वयातील बाल्या आहेत. त्यांना तसेच शब्द समजतात आणि कळतात. जशी ज्यांची बुद्धी तशी त्यांची वृत्ती त्या बुद्धीप्रमाणे ते बोलतात. बालीश बुद्धी असेल तर बाल्याला दुसरा कोणता शब्द सूचणार आहे, असे म्हणत विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर दिल्लीतील लाल्या म्हणत टीका केली होती. या टीकेला प्रत्युत्तर देताना काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी असे म्हटले आहे.

ते पुढे म्हणाले की, शिवसेनेच्या चिन्हाचा निर्णय हा न्यायप्रविष्ट आहे.संविधानावर विश्वास असणारे लोकं आहोत. कायद्यांचे राज्य आहे तो मोडून कुठलाही निर्णय होऊ शकणार नाही अशी संधी आज चालून आली आहे, उद्याच्या पिढीला दिशा देणारा असेल. निर्णय कायद्याने आणि संविधानाने होतात हे दाखवण्याची सुप्रीम कोर्टाला आहे.

**..तर आम्ही बघ्याची भूमिका घेणार नाही**

वडेट्टीवार म्हणाले की, आमच्यावर जर कुणी अन्याय करत असेल तर आम्ही बघ्याची भूमिका घेणार नाही. सकल ओबीसी समाजाने आयोजित केलेल्या मेळाव्याचा मी सोबत आहे. माझ्या नेतृत्वात हा मेळावा नाही मी एक कार्यकर्ता म्हणून त्यांच्यासोबत आहे. मी एक कार्यकर्ता आणि नेता म्हणून काम करत आहोत. मोर्चात येणाऱ्या प्रत्येकाचे स्वागत करु.

देशाचे पंतप्रधान हे दोन दिवसीय मुंबई दौऱ्यावर आहेत. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे उद्घाटन सोहळे पार पाडले जात आहेत. पंतप्रधान महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले असताना शेतकऱ्यांसाठी मोठ्या पॅकेजची घोषणा करावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

**मनपा निवडणुकीची तयारी सुरू**

वडेट्टीवार म्हणाले की, नवी मुंबई विमानतळाचे काम अपूर्ण आहे, डिसेंबरपासून या विमानतळावरून उड्डाण होणार आहेत अशा वेळी अपूर्ण राहिलेल्या कामाचे उद्घाटन हे फक्त श्रेय घेण्यासाठी सुरू आहे.

महापालिका निवडणुकीच्या तोंडावर मत मिळवण्यासाठी इव्हेंट जोरात सुरू आहे पण ते करताना राज्यातील बळीराजाचा विसर केंद्र सरकारला पडता कामा नये. पंतप्रधानांनी शेतकऱ्यांना देखील भरभरून दिले पाहिजे, शेतकऱ्यांना मदत जाहीर करून दिलासा दिला पाहिजे अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

# सरकारला फक्त व्यापाऱ्यांची चिंता

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ८ :



यंदा निसर्गाने थैमान घातले. शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकरी कर्जमाफीची वाट पाहत आहेत. मात्र सरकारला शेतकऱ्यांची नाही, तर व्यापाऱ्यांची चिंता आहे. हे व्यापाऱ्यांचे हित जपणारे सरकार आहे. शेतकऱ्यांना संघटित व्हावे लागणार आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण लढा उभारला आहे. मी येत्या २८ ऑक्टोबरला नागपूर येथे धडक देणार आहे, असे माजी राज्यमंत्री बच्चू कडू म्हणाले.

सरकारकडे पैसा आहे, पण तो शेतकऱ्यांसाठी नाही. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना हरवण्यासाठी महायुती सरकारने गृहनिर्माण धोरणात परवडणाऱ्या घरांसाठी ७५ हजार कोटी रुपयांची तरतूद केली. शक्तीपीठ महामागासाठी ८६ हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहे. शेतकऱ्यांच्या तोंडाला मात्र पाने पुसली जात आहे, अशी टीका बच्चू कडू यांनी केली आहे.

# वंचित काँग्रेसोबत जाणार

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ८ :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार उलथवून टाकण्यासाठी काँग्रेससोबत आघाडी करण्यात आम्हाला काहीच अडचण नाही, असा पुनरुच्चार वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.

केवळ मतचोरीच नव्हे, तर सर्वच मुद्यांवर आमची राहुल गांधींसोबत एकत्र येण्यास हरकत नाही, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी वंचित बहुजन आघाडी काँग्रेस प्रणित महाविकास आघाडीत प्रवेश करणार काय? असा प्रश्न चर्चिला जात आहे.

प्रकाश आंबेडकरांनी आज अकोल्यातील आपल्या निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी राज्यातील ओला दुष्काळ, मराठा ओबीसी आरक्षण वाद, सध्याचा राजकीय घटनाक्रम आदी विविध मुद्यांवर विस्तृत प्रकाश टाकला. विशेषतः वंचित बहुजन आघाडीची काँग्रेससोबत आघाडी करण्यास काहीही हरकत नसल्याचेही पुन्हा एकदा स्पष्ट केले.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप वगळता इतर कोणत्याही पक्षाशी आघाडी करण्याचे अधिकार आम्ही आमच्या स्थानिक नेतृत्वाला दिलेत. या प्रकरणी एकनाथ शिंदे यांची शिवसेना व अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसशीही आमची युती करण्याची तयारी आहे.

आमची काँग्रेससोबतही आघाडी करण्याची तयारी आहे. केवळ मतचोरीच्याच नव्हे तर सर्वच मुद्यावर राहुल गांधींसोबत एकत्र येण्यास आमची हरकत नाही. मोदींची सत्ता उलथवून टाकण्यासाठी एकत्र येण्यास आम्हाला काहीच अडचण नाही. आंबेडकरांनी यावेळी राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या मुद्यावरून महायुती सरकारवर सडकून टीका केली. तसेच विरोधकांनाही फैलावर घेतले.


रविवार दि. १२ ऑक्टोबर, सायं. ६.३०

Banyan Hall, चिटणवीस सेंटर, नागपूर



महासागर द्वारा आयोजित


स्मरण सुरेश भटांचे

"मराठी ग़ज़ल के उस्ताद सुरेश भट और..."

या प्रदीप निफाडकर लिखित हिंदी पुस्तकाचा प्रकाशन सोहळा, आणि

गीत गझल संगीत संध्या...

-गायक कलाकार-



श्याम जैन



श्रुती जैन



लेखक- प्रदीप निफाडकर

कार्यक्रम व्यवस्था

RutuRang Entertainment

BHAKTI JADHAV PRODUCTIONS

हॉलवर निमंत्रिका ३० मि. आधी उपलब्ध





श्री बालाजी महाराज यात्रा

देऊळगाव राजा, जि.बुलढाणा (महाराष्ट्र)

कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| घटस्थापना | आश्विन शु. १ | सोमवार, दि.२२/०९/२०२५ |
| मंडपोत्सव | आश्विन शु. ८ | मंगळवार, दि.३०/०९/२०२५ |
| दसरा पालखी मिरवणूक | आश्विन शु.९-१० | बुधवार, दि.०१/१०/२०२५ मध्यरात्री पासुन ते गुरुवार, दि.०२/१०/२०२५ पर्यंत |
| ललीत | आश्विन कृ. ४ | शुक्रवार, दि.१०/१०/२०२५ सकाळी ५.४५ वा.(सूर्योदयी) |

भक्तांनी दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घ्यावा.

सूचना : भक्तांनी संस्थान कार्यालयात कानगी (देणगी) स्वेच्छेने जमा केल्यास पावती व प्रसाद मिळेल.



• विनीत •

राजे विजयसिंह जाधव

राजे लखुजीराव जाधव यांचे सिंदखेड राजा व देऊळगाव राजा शाखेचे वंशज आणि वंशपारंपरिक विश्वस्त, श्री बालाजी संस्थान, देऊळगाव राजा

कि.दा.बीडकर

व्यवस्थापक, श्री बालाजी संस्थान, देऊळगाव राजा

आश्विन यात्रा उत्सव
दि.२२/०९/२०२५ ते दि.१८/१०/२०२५

कार्तिक यात्रा उत्सव
दि.२२/१०/२०२५ ते दि.१६/११/२०२५

तसेच जवळखेड, उमरद, मेव्हणाराजा, आडगावराजा, किनगावराजा वंशज शाखा, सर्व समाज सेवेकरी, मानकरी व यात्रा समिती सदस्य